|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ | अंक : ९ | सोमवार दि. १९ फेब्रुवारी २०२४ ते रविवार दि. २५ फेब्रुवारी २०२४ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## प्रियकराला तिची जराही आली नाही कीव तुरुंगातून सुटताच प्रेयसीचा घेतला जीव

चंद्रपुर/क्राईम रिपोर्टर

प्रेम आंधळे असते त्यामुळे काही मुली डोळे असूनही आंधळ्या सारख्या कुणाच्याही प्रेमात पडतात आणि प्रियकराची असलीयत जेंव्हा त्यांना समजते तेंव्हा त्यांच्यावर पश्चाताप करण्याची पाळी येते, पण तोवर उशीर झालेला असतो. काही काही गुन्हेगारी प्रवृतीचे तरुण आपल्या प्रेयसीची हत्या करायलाही मागेपुढे पाहत नाहीत. चंद्रपूरच्या बल्लारपूरमध्ये तुरुंगातून सुटून आलेल्या एका गुन्हेगाराने प्रेयसीला घरी बोलावून तिची हत्या केली. ...पान २ वर

# आईला बाप मारतो म्हणून मुलगा भयंकर चिडला जन्मदात्याचाच जीव घेऊन रक्ताचा सडा पाडला

अमरावती/क्राईम रिपोर्टर

कौटुंबिक वाद जर लवकर मिटवले नाहीत तर त्यातून काहीही घडू शकते आणि आजकाल माणसाला छोट्या छोट्या गोष्टीवरून राग येतो आणि रागाच्या भरात कधी कधी माणसाच्या अंगात सैतान संचारतो अशावेळी तो दोस्ती-यारी, नाती-गोती कशाचाही विचार करीत नाही. त्यातूनच भावाने भावाचा, मुलाने वडिलांचा किंवा आईचा खुन्खून करण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे रक्ताची नाती जपण्यासाठी कौटुंबिक कालः वाढणार नाहीत याची कुटुंबातील प्रत्येकाने काळजी घ्यायला हवी. त्यासाठी जबाबदारीने वागायला हवे. आपल्यामुळे आपल्या कुटुंबातील कोणाला त्रास होणार नाही याकडे लक्ष द्यायला हवे आणि मुख्य म्हणजे घरातील वाद जिथल्या तिथे मिटवायला हवेत. कारण एकदाका असे वाद वाढले कि त्यातून कौटुंबिक आत्मीयता संपुष्टात येते घरातली माणसेच एकमेकांची शत्रू बनतात आणि मग कधी तरी हे वाद विकोपाला गेले रक्ताच्या नात्यातच रक्ताचे पाट वाहतात. रक्ताची नाती कलंकित होतात.
सर्वसाधारणपणे आई आणि मुलगी यांच्यात खूप असते, पण तितकी जवळीक आणि प्रेम बाप-बेट्यात नसते त्यामुळे बाप बेट्यात कोणत्या ना कोणत्या कारणावरून वाद होत असतात. मुलगा जर बापाच्या विरुद्ध गेला तर बाप त्याला आपल्या संपत्तीमधून बेदखल सुद्धा करतो अशी अनेक प्रकरणे घडली आहेत. अमरावतीत रक्ताच्या नात्याला काळिमा फासणारी अशीच एक घटना घडली आहे. बाप आईला खूप मारतो म्हणून एका मुलाने बापाचीच हत्या केली. या प्रकरणी आरोपी मुलाला पोलिसांनी अटक केली.



आईला मारहाण केल्याचा राग अनावर झाल्याने मुलाने वडिलांवर लोखंडी बत्त्याने हल्ला चढवून त्यांची हत्या केली. ही धक्कादायक घटना भातकुली ठाण्याच्या हद्दीतील सायत येथे घडली. या प्रकरणी आरोपी मुलास अटक करण्यात आली आहे. राजेश श्रीराम मिसाळ (६०) रा. सायत असे मृत वडिलांचे तर अंकुश राजेश मिसाळ (२९) रा. कोकर्डा असे आरोपी मुलाचे नाव आहे. राजेश हे नेहमी पत्नीसोबत वाद घालून तिला मारहाण करीत होते. सोमवारी त्यांनी पत्नीला मारहाण केल्याची बाब दर्यापूर तालुक्यातील कोकर्डा येथे आजीकडे राहणारा मुलगा अंकुशला कळली. वडिलांनी आईला मारहाण केल्याचा राग अनावर झाल्याने अंकुशने थेट सायत गाठले. घरी पोहोचताच त्याने वडील राजेश यांना त्याचा जाब विचारला. या कारणावरून दोघांत वाद झाला. या वादात अंकुशने वडील राजेश यांच्या डोक्यावर लोखंडी बत्त्याने हल्ला चढविला. त्यात गंभीर जखमी झालेल्या राजेश यांचा जागीच मृत्यू झाला. याबाबत माहिती मिळताच भातकुली पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला व मृतदेहाला शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मुलगा अंकुशविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. पुढील तपास ठाणेदार प्रवीण वांगे यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.

**कोणत्याही कारणावरून माणसाने कधीही टोकाचा निर्णय घेता नये. खास करून आई-वडिलांच्या बाबतीत तरी संयम राखायला हवा. कारण जगात सर्व काही मिळेल पण आई-वडील मिळू शकणार नाहीत. पण आजकाल लोक छोट्या छोट्या गोष्टींवरून इतके हायपर होतात की रक्ताचे नातेही रक्तरंजित करतात!**

# एकाच बाईकवर होते तीन टपोरी यार पादचाऱ्याशी वाद होताच त्याला केले ठार



मुंबई/एस.कुमार

**मोटार सायकलवर ट्रिपलसीटला परवानगी नसली तरी काही टपोरी लोक वाहतुकीचे नियम तोडून ट्रिपल सीट जातात. अशावेळी त्यांचा एखाद्याला धक्का लागला तर सॉरी म्हणून माफी मागण्याऐवजी त्यालाच मारायला उठतात. साकीनाका येथे अशाच एका घटनेत बाईक वरून ट्रिपल सीट जाणाऱ्या टपोऱ्यांच्या बाईकचा रस्त्यावरील तरुणाला धक्का लागला. त्यामुळे त्या पादचाऱ्याने गाडी थांबवून अंधे हो क्या असे रागाच्या भरात विचारले याचा त्या तिघांना इतका राग आला कि तिघांनी मिळून त्या पादचाऱ्याला बेदम मारहाण करून त्याचा जीव घेतला. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे.**

उत्तरप्रदेश राज्यातील बस्ती जिल्ह्यातील थाना-मुंडरवा येथील देवरीया गावातील रहिवासी असलेलं सदाम हुसेन ईमामुद्दीन अन्सारी (वय ३२) हे कोल्हापुर इस्टेट, खान मेडीकल, यादव नगर खैराणी रोड, साकीनाका मुबई, येथे त्यांचा धाकटा भाऊ सुहेब उर्फ शोएब सुहेबुद्दीन ईमामुद्दीन अन्सारी (वय २२) यांच्या सोबत राहतात. ते कापडावरील जरीकाम करतात. विणलेल्या कापडावर शोभादायक आकृतिबंधक (नक्षी) तयार करण्यात ते पटाईत आहेत.सदाम अन्सारी हा उधोगि माणूस! त्याला कधी कसला म्हणून कंटाळा नाही. आळस नाही. आणि म्हणून त्याचा कामात कधीच खंड नाही.सुटीच्या दिवशी देखील हे दोघेही भाऊ कारखाना येऊन काम करत असे. दोघेही भाऊ कामात गर्क असायचे. उद्योग हेच त्यांचे दैवत आणि म्हणूनच तिथे सदैव लक्ष्मी वास करीत असे. दिनांक ११ फेब्रुवारी २०२४ रोजी सदाम हुसेन ईमामुद्दीन अन्सारी यांचा धाकटा भाऊ सुहेब उर्फ शोएब अन्सारी हे दोघेही सकाळ पासून काम करीत होते. आता दुपार झाल्याने जेवणाची वेळ झाली होती.म्हणून त्यांनी भाऊ सुहेब उर्फ शोएब अन्सारी याला जेवणाचा डबा आणण्यासाठी बाहेर पाठवले. दुपारी १२.00 वा च्या सुमारास दुपारचे जेवण आणण्यासाठी सुहेब उर्फ शोएब अन्सारी हा बाहेर पडला. बराच वेळ झाला तरी तो डब्बा घेऊन ...पान ६ वर

# घटस्फोट झाल्यामुळे सुडाने पेटला रागाच्या भरात आईचा जीव घेतला

पुणे/क्राईम रिपोर्टर

**आई या दोन शब्दात संपूर्ण भाव विश्व समावलेले आहे. जिने ९ महिने मुलाला उदरात वाढवले. काबाडकष्ट करून ज्याला लहानाचे मोठे केले तोच मुलगा मोठेपणी कृतघ्न होऊन आपल्या जन्मदातीच्या मानेवर सुरी फिरवून तिची हत्या करू शकतो हि कल्पनाही सहन होत नाही. पण प्रत्यक्षात पुण्याच्या खडकीमध्ये असे घडले आहे. आपल्या घटस्फोटाला आईच जबाबदार आहे असा संशय असलेल्या एका नराधम मुलाने आईची हत्या केली. या प्रकरणी आरोपी मुलाला पोलिसांनी अटक केली आहे.**

घटस्फोटाला आई जबाबदार असल्याच्या संशयातून मुलाने आईचा गळा चिरून खून केल्याची धक्कादायक घटना खडकी भागात रविवारी घडली. आईचा खून करून पसार झालेल्या मुलाला शिर्डीतून पोलिसांनी ताब्यात घेतले. गुंफाबाई शंकर पवार (वय ५५, रा. श्रीरामपूर, जि.अहमदनगर) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी मुलगा ज्ञानेश्वर शंकर पवार (वय २९, रा. खडकी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आईचा खून करून पसार झालेल्या ज्ञानेश्वरला पोलिसांनी शिर्डीतून ताब्यात घेतले. गुंफाबाई मूळच्या श्रीरामपूर परिसरातील मुठे वडगावातील रहिवासी आहेत. त्यांना दोन मुले आहेत. ज्ञानेश्वर खडकीत राहायला असून, तो दारूगोळा कारखान्यात कामाला आहे. ...पान २ वर

# उसन्या पैशाच्या वसुलीवरून वाद झाला जुगाराच्या अड्ड्यावर बॉक्सरचा खून झाला

जळगाव/क्राईम रिपोर्टर

**गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांशी कुणीही आर्थिक व्यवहार करू नये. पण काही लोक असे करतात आणि उसने दिलेले पैसे वेळेवर परत मिळाले नाही कि मग वसुली वरून वाद सुरु होतो. भुसावळमध्ये जुगाराचा अड्डा चालवणारा रोशन हुसळे याने त्याच्याकडे पत्ते खेळण्यासाठी येणाऱ्या भावेश भालेराव नावाच्या बॉक्सर कडून उसने पैसे घेतले होते. पण तो परत करीत नव्हता. यावरून भावेश व रोशन यांच्यात वाद सुरु झाला. या वादातून रोशन हुसळे आपल्या जुगाराच्या अड्ड्याची माहिती पोलिसांना देईल या भीतीने रोशन याने भावेशचा कायमचा काटा काढायचे ठरवले आणि एके दिवशी जुगार खेळायला आलेल्या रोशनची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**





जळगाव जिल्ह्यातील भुसावळ हे तालुक्याचे ठिकाण रेल्वेचे जंक्शन स्टेशन देखील आहे. याठिकाणी देशभरातील सर्व प्रकारच्या प्रवासी आणि मालवाहू रेल्वेगाड्या थांबतात. आशिया खंडातील हे मोठे रेल्वे स्थानक आहे. याठिकाणी रेल्वेचा अवाढव्य कारभार असल्यामुळे साहजीकच येथे गुन्हेगारी देखील बोकाळली आहे. याठिकाणी गुन्हेगारांना उतरण्यासाठी, मुक्कामासाठी जागा आणि पलायन करण्यासाठी हजर स्टॉकमधे





रेल्वेगाड्या उपलब्ध असतात. भुसावळ शहरानजीक दिपनगर हे विज निर्मितीचे स्टेशन आहे. या थर्मल पॉवर स्टेशनला विज निर्मीतीसाठी कोळश्याची गरज भासते. त्यामुळे रेल्वेने ...पान २ वर

# मित्राच्या प्रेयसीला पटवून तो दगाबाज ठरला मैत्रीत गद्दारी करणाऱ्या मित्राचा गळा चिरला

नागपूर/क्राईम रिपोर्टर

**मित्राच्या प्रेयसीला पटवून दोस्तीत गद्दारी करणाऱ्या एका तरुणाला व्हॅलेनटाईन डे दिनाच्या दिवशीच त्याच्या मित्राने ठार मारले आणि पोलीस ठाण्यात जावून हजर झाला. विशेष म्हणजे आरोपी बिपीन हा कुख्यात गुंड असून त्याच्यावर २१ गंभीर दाखल आहेत. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे.**

जगभरात 'व्हॅलेंटाईन डे'साजरा होत असताना उपराजधानीत मात्र प्रेयसीच्या प्रेमावर संशय घेत मित्राचा कोयत्याने वार करून खून करण्यात आला. ही थरारक घटना बुधवारी सकाळी ११ वाजता मानेवाडा चौकाजवळ नाईकनगरात घडली. सूरज ऊर्फ बिहारी अमिर महतो (२५, रा.बालाजीनगर. मानेवाडा रोड) असे मृत युवकाचे तर विपीनकुमार गुप्ता (२५, नाईकनगर) असे आरोपीचे नाव आहे. हत्याकांडानंतर आरोपी स्वत:हून अजनी पोलीस ठाण्यात पोहचला आणि पोलिसांच्या स्वाधीन झाला. नवे पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी पदभार स्वीकारताच नागपुरातील गुन्हेगारांनी पुन्हा तोंड वर काढले आहे. पोलिसांची दहशत नसल्यामुळे गुन्हेगारी वाढत असल्याचे चित्र आहे. सूरज महतो हा कुख्यात गुंड असून त्याच्यावर जवळपास २१ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्याला नागपुरातून तडीपार करण्यात आले होते. मात्र, तो अजनी, बेलतरोडी आणि हुडकेश्वर पोलिसांशी मैत्री करून शहरातच राहत होता. त्याची आरोपी बिपीनकुमार गुप्ताशी मैत्री होती. ...पान २ वर

# जमिनीचा वाद खूपच विकोपाला गेला क्षीरसागर कुटुंबाने शिंदेचा खून केला

नाशिक/क्राईम रिपोर्टर



**ग्रामीण भागात जमिनीचे वाद असतात आणि कधी कधी हे वाद इतक्या विकोपाला जातात कि त्यातून एखाद्याच्या प्राणावरही बेतू शकते. चांदवड तालुक्यातील दुगावमध्ये राहणाऱ्या शिंदे आणि क्षीरसागर या दोन कुटुंबात असाच जमिनीचा वाद होता. याच वादातून क्षीरसागर कुटुंबाने राजेंद्र शिंदे यांची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यात दुगाव शिवारातराजेंद्र शिंदे हे गृहस्थ रहातात. त्यांची दोन लग्ने झाली असून दोन्ही बायका एकत्र नांदतात. एका पत्नीचेनाव सुनिता, दुसऱ्या पत्नीचे नावशितल आहे. त्याशिवाय त्यांच्याघरात वडील केदू उखा शिंदे, आईताराबाई केद्र शिंदे, तसेच राजेंद्रयांची मुले सई, ऋतुजा आणि साहिल असे सर्व जण एकत्रित कुटुंबात रहातात. राजेंद्र शिंदे यांचा शेतीचा व लँड डेव्हलपचा व्यवसाय आहे. लँड डेव्हलप व्यवसायासाठी त्यांनी दुगावमधीलच जय जनार्दनसंकुलमध्येऑफिससुरू केले होते. दि. १६ जानेवारी२०२४ रोजी सकाळी १०वाजण्याच्या सुमारास घरातूनजेवणाचा डबा घेवून ते ऑफिसमध्येगेले. दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास चंचल क्षिरसागर, त्याची आई, भाऊ, मुले व पत्नीसह इतर लोक त्यांच्या ऑफिसजवळ असलेल्या कॉम्प्लेक्सजवळ आले. तिथे ते लोक शिंदे यांच्याशी जमिनीच्या व्यवहारावरून वाद घालू लागले. पहाता पहाता या वादातून ते लोक शिंदे यांना शिवीगाळ करू लागले, त्यामुळे राजेंद्र शिंदे यांनी लगेचच आपल्या घरी फोन करून ही सगळी माहितीपत्नी शितल हिला दिली. आपल्या पतीशी काही लोक वाद घालत आहेत, पती एकटे ऑफीसमध्ये आहेत, तर ते लोक जमाव करून ऑफीसमध्ये शिरले आहेत हे लक्षात येताच राजेंद्र यांची शितल आपली सवत ...पान २ वर

# दोघांच्या प्रेमात तिसऱ्याची एन्ट्री झाली पहिल्या प्रियकराने दुसऱ्याची हत्या केली



मयत संतोष

तासगाव/क्राईम रिपोर्टर

**विवाहितांचे अनैतिक संबंध सहसा लपून रहात नाहीत. मात्र अशा संबंधात तिसऱ्याची एन्ट्री झाली कि त्यातून जो प्रेमाचा त्रिकोण निर्माण होतो तो कधीतरी जीवघेणा ठरू शकतो. तासगाव नजीकच्या साव्लाज मध्ये पतीला सोडून माहेरी रहात असलेल्या एका महिलेचे त्याच गावातील बाळासाहेब नावाच्या तरुणाशी अनैतिक संबंध होते. पण नंतर तिने संतोष नावाच्या तरुणाशी संधान जुळवले व बाळासाहेब याला टाळू लागली. आपली प्रेयसी आपल्याला सोडून संतोषला चिकटली या गोष्टीचा बालासाहेबाला भयंकर राग आला आणि याच रागातून त्याने संतोषचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

सावळज येथीलच भावकीतील मुलशी संतोष याने गेल्या अडीच वर्षापूर्वी प्रेमविवाह केल्याने त्याचे त्याच्या मेहुण्याशी आणि त्या मुलीच्या घरच्या लोकांशी संपर्क तुटला होता. या प्रेमविवाहाने त्याच्यात गेल्या अडीच वर्षापासून वाद विवाद आणि तंटा होत होता. ती मुलगी त्याच्या मेहुण्याच्या नात्यातील असल्याने त्याचा मेहुणा ओंकार शिवाजी पाटील हा त्याचेवर डुख धरून होता. आपल्या पाहुण्याने आपल्याच नात्यातील मुलीला पळवून ...पान २ वर

# पूर्ववैमनस्य जीवघेणे ठरले पाणक्या जंबा याला ठार मारले

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर



**पूर्वीच्या वादातून जर एखाद्यावर कुणाची खुन्नस असली कि तो माणूस डुख धरून संधीची वाट पाहत असतो आणि संधी मिळताच ज्याच्यावर त्याचा राग असतो. त्याचा जीव घ्यायलाही मागेपुढे पाहात नाही. करवीर तालुक्यातील कुडित्रे गावातील जांबासाठे या पाणी पुरवठा खात्यातील इसमाच्या बाबतीतही असेच झाले. जंबा याने गावातीलच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या रत्नदीप भास्कर याला एका प्रकरणात तंबी दिली होती. याच रागातून रत्नदीप याने जंबा याची लाकडी दांड्याचे प्रहार करून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

करवीर तालुक्यातील कुडित्रे हे गाव तसे सधनच म्हणावे लागेल. कोल्हापूर पासून जवळ असल्याने या गावातील बुहतेक लोक हे अर्थिक दृष्ठया सधनच आहेत. गावातील अनेकांची शेती हा व्यवसाय असल्याने शेतीला पाणी पुरवठा करणाऱ्या संस्था ही आहेत. कुडित्रे येथील शाहु हरिजन पाणी पुरवठा संस्थेत आंबेडकर नगरातील गावातील जंबाजी साठे हा पाणक्या म्हणून काम करीत असे. या संस्थेत गेल्या



आरोपी रत्नदिप

२३ वर्षापासून जंबाजी साठे हे पाणक्या म्हणून काम करीत असल्याने गावातील लोक त्याला आपल्या ऊसाला पाणी कधी मिळेल हे हक्काने विचारीत होते. जंबा साठे याची परिस्थीती तशी बेताचीच. पाणी पुरवठा संस्थेत काम करून तो आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत होता. पत्नी चार मुली आणि मुलगा असा त्याचा परिवार होता. त्याने आपल्या चारही मुलीची लग्ने करून दिली असल्याने तो सध्या पत्नी आणि ...पान ६ वर

पान १ वरून...

## प्रियकराला तिची जराही आली ...

या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर शहरातील महाराणा प्रताप वॉर्डातील सम्यक चौक परिसरातील एका तरुणीचे एका मुलासोबत प्रेमप्रकरण सुरू होते. याच प्रकरणातून आरोपीने तिची निर्घृण हत्या केल्याची घटना शुक्रवारी महाराणा प्रताप वॉर्डातील सम्यक चौकात घडली आहे. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी ही हत्या प्रेम प्रकरणातून झाल्याचा संशय व्यक्त केला आहे. मृतक तरुणीचे नाव रक्षा कुमरे (२२) रा. महाराणा प्रताप वार्ड, सम्यक चौक बल्लारपूर असे आहे. तर सिनू दहागावकर (२९) असे आरोपीचे नाव असून, तो घटनेनंतर फरार झाल्याची माहिती आहे. रोपी सिनू दहागावकर हा आई रामबाई सोबत राहत आहे. त्याची आई रामबाई ही शुक्रवारी कामावरून घरी आली. त्यावेळी घरात एक मुलगी रक्ताच्या थारोळ्यात पडून असल्याचे दिसून आले. तिचा मुलगा सिनू हा पूर्वीपासून गुन्हेगारी प्रवृत्तीचा असल्याची माहिती आहे. तो काही दिवसांपूर्वीच तुरुंगातून बाहेर आला होता. त्याने शुक्रवारी सायंकाळी रक्षा हिला स्वतःच्या घरी बोलावून घेतले. रक्षा घरी आल्यावर सिनूच्या मनात मात्र वेगळाच कट शिजत होता. रक्षा सिनुच्या घरी येताच प्रेमप्रकरणावरून त्यांच्यात वाद झाला. याच वादातून सिनूने रक्षाच्या डोक्यावर धारदार शस्त्राने वार करून हत्या केली आणि घरातून पळ काढला. आरोपीची आई घरी आल्यानंतर ही घटना उजेळात आली. आईने आरडाओरडा केल्यानंतर शेजारी पाजारी गोळा झाले. त्यानंतर ही वार्ता वाऱ्यासारखी शहरात पसरताच वॉर्डातील लोकांनी घटनास्थळी एकच गर्दी केली. त्याच दरम्यान बल्लारपूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक असिफराजा शेख पोलीस पथकासह घटनास्थळी दाखल झाले. घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविला आहे. आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास बल्लारपूर पोलीस करीत असून अद्याप मारेकऱ्याला अटक करण्यात आलेली नव्हती.

## घटस्फोट झाल्यामुळे सुडाने पेटला...

दुसरा मुलगा देहूरोड परिसरात राहायला आहे. शनिवारी त्या मुलांना भेटण्यासाठी पुण्यात आल्या होत्या. ज्ञानेश्वरचा घटस्फोट झाला आहे. तो एकटाच राहायला आहे. घटस्फोटाला आई जबाबदार असल्याचा संशय त्याला होता. शनिवारी मध्यरात्री गाढ झोपेत असलेल्या गुंफाबाईचा गळा ज्ञानेश्वरने चाकूने गळा चिरून खून केला. त्यानंतर तो घराला कुलुप लावून पसार झाला. रविवारी सकाळी गुंफाबाईच्या नातेवाईकांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. त्यांनी प्रतिसाद न दिल्याने संशय आला. त्यामुळे नातेवाईकांनी देहूरोड परिसरात राहणाऱ्या ज्ञानेश्वरच्या भावाशी संपर्क साधला. त्यानंतर ज्ञानेश्वरचा भाऊ रविवारी सकाळी खडकीतील घरी आला. तेव्हा घराबाहेर आईची चप्पल आढळून आली. घराला बाहेरून कुलुप होते. त्याने घराची खिडकी उघडून पाहिली. तेव्हा आई रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे निदर्शनास आले. या घटनेची त्याने पोलिसांनी कळविली. खडकी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीश दिघावकर यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. गुंफाबाई यांच्या अंगावर दागिने होते. मात्र, त्यांचा मुलगा ज्ञानेश्वर घरात नव्हता. त्याचा मोबाइल क्रमांक बंद असल्याने संशय बळावला. तांत्रिक तपासात तो पसार झाल्याचे लक्षात आले. तो शिर्डीतील पुणेतांबे परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर खडकी पोलिसांचे पथक रवाना झाले. पुणतांबे परिसरातून त्याला सायंकाळी ताब्यात घेण्यात आले.

## उसन्या पैशाच्या वसुलीवरून वाद...

येणाऱ्या कोळश्याचीया परिसरात चोरी होत असते. त्या अनुशंगाने या परिसरात गुन्हे देखील घडत असतात. यार्डात अथवा आऊटरला थांबलेल्या गाड्यांच्या वॅगनचे दरवाजे उघडून खुलेआम कोळशाची चोरी होण्याचे प्रकार भुसावळलासुरु असल्याचे लोक बघतात. दिपनगर परिसरातील विट भट्टीसह महामार्गालगत असलेल्या ढाब्यांवरील शेगड्यांना कोळसा लागत असतो. रेल्वे वॅगनमधून चोरी केलेला कोळसा याठिकाणी विक्री केला जातो असे लोक दबक्या आवाजात म्हणत असतात. भुसावळ शहरानजीक फेकरी शिवारात रेल्वेचे झेडटीसी अर्थात झोनल ट्रेनिंग सेंटर आहे. रेल्वेत नोकरी मिळालेल्या कर्मचाऱ्यांना याठिकाणी भरतीपुर्व प्रशिक्षण दिले जाते. या परिसरात रोशन बबन हुसळे आणि सागर बबन हुसळे हे दोघे भाऊ कोळसा चोरीत अग्रेसर असल्याची कुजबुजलोक करत असतात. याशिवाय हे दोघे हुसळे बंधू पत्ते खेळण्याचा अड्डा देखील चोरुन लपून चालवत होते. फेकरी शिवारातील भगवान सावळे नगर आणि झेडटीसी परिसरातील शिव रोडच्या बाजुला पडीक जागेतील काटेरी झाडाझुडूपात या दोघा हुसळे बंधूंच्या अधिपत्याखाली पत्त्यांचा डाव चालवला जात असे. पत्ते खेळण्याची सवय असलेले तरुण याठिकाणी पत्त्यांचा डाव खेळण्यासाठी येत होते. आलेल्या ग्राहकांना पत्त्यांचा डाव खेळण्यासाठी जागा, पत्त्यांची कॅट आणि आवश्यक इतर साहित्य उपलब्ध करुन दिले जात होते. हळूहळू या हुसळे बंधूंचा हा बेकायदा धंदा जोर धरण्यास सुरुवात झाली. परिसरात राहणारे, मजुरी करणारे तरुण हेच या हुसळे बंधूंचे पत्ते खेळणारे ग्राहक होते. ज्यादिवशी या मजुरांना कामधंदा नसायचा त्यादिवशी हे तरुण याठिकाणी पत्ते खेळण्यासाठी येत होते. इतर ग्राहकांप्रमाणेच भावेश अनिल भालेराव हा तरुण देखील याठिकाणी रमीचा डाव खेळण्यासाठी येत होता. भावेश भालेराव आणि रोशन हुसळे या दोघांचा गेल्या काही दिवसांपासून आर्थिक वाद सुरु होता. चर्चेतून समजलेल्या माहितीनुसार बॉक्सिंगपटू भावेश भालेराव याने रोशन हुसळे याला काही रक्कम उधार दिली होती. भावेश आपले पैसे रोशनकडे मागत होता. भावेशचा पैशांसाठी सततचा तगादा सुरु असल्यामुळे रोशन वैतागला होता. याशिवाय आपल्या अवैध धंद्यांची माहिती भावेश पोलिसांना तर देत नसावा अशीदेखील शंका हुसळे बंधूंना येत होती असे म्हटले जाते. त्यामुळे भावेशचा कायमचा काटा काढण्याचे रोशनचे नियोजन सुरु होते. रोशन हा भावेशचा काटा काढण्यासाठी संधीची वाट बघत होता. भावेश भालेराव आणि रोशन हुसळे यांच्यातील आर्थिक वाद पराकोटीला गेला होता. १३ जानेवारी रोजी मजुरीचे काम नसलेले काही तरुण याठिकाणी झाडाझुडुपात असलेल्या अड्ड्यावर रमीचा डाव खेळण्यास आले होते. अड्ड्यावर भावेश भालेराव हा देखील आला होता. भावेशला बघून रोशन हुसळे याच्या मनात त्याच्याविषयी राग संचारला. भावेश भालेरावसह सहा ते सात जण रमीचा डाव खेळण्यात दंग असतांना अचानक पावणे बारा वाजेच्या सुमारास रोशन हुसळे हा हातात लोखंडी रॉड घेऊन आला. आलेल्या रोशनने थेट भावेशच्या दिशेने चाल केली. हातातील लोखंडी रॉडने त्याने थेट भावेशच्या डोक्यावर घाव घातला. दोन्ही हातांनी पुर्ण ताकदीनिशी डोक्यावर लोखंडी रॉडचा घाव बसल्यामुळे बॉक्सिंगपटू भावेश जमीनीवर कोसळला. जमीनीवर कोसळलेल्या भावेशच्या डोक्यात संतप्त रोशन हुसळे याने अजून घाव घालण्यास सुरुवात केली. एवढे कमी झाले म्हणून की काय रोशन हुसळे याच्यासोबत असलेला त्याचा साथीदार आकाश परदेशी याने त्याच्याकडील चाकूने जखमी भावेशच्या गळ्यावर घाव घातले. एकाच वेळी डोक्यावर लोखंडी रॉडचे घाव आणि गळ्यावर चाकूचे घाव झाल्याने भावेशचे मरण निश्चित झाले. अचानक खूनी हल्ल्याची घटना आपल्या नजरेसमोर झाल्याचे बघून पत्त्यांचा डाव खेळणारे आणि खेळण्यास आलेले सर्वजण घाबरुन हातातील पत्ते जागेवरच सोडून पळून गेले. हल्लेखोर रोशन हुसळे आणि त्याचा भाऊ सागर हुसळे या दोघांविरुद्ध पोलिस दप्तरी विविध गुन्हे दाखल असल्यामुळे घाबरुन घटनास्थळावरुन पलायन करणाऱ्या कुणीही पोलिसांना घटनेची माहिती दिली नाही.

दरम्यान घरातून बाहेर गेलेला भावेश अद्यापही घरी परतआला नाही म्हणून त्याची आई हैरान झाली. भावेशचा मोठा भाऊहरीष आपले मजुरीचे काम आटोपून दुपारी साडेतीन वाजता घरी परत आला. त्यावेळी त्याला त्याच्या आईने म्हटले की दुपार उलटून गेली तरी भावेश घरी परत आलेला नाही. तो कुठे गेला असेल काही कळायला मार्ग नाही. त्याचा मोबाईल देखील लागत नाही. काहीतरी अघटीत तर झाले नसेल या भितीने त्याची आई धास्तावली होती. हरिष भालेराव याने त्याचा लहान भाऊ भावेश याचा सर्वत्र शोध घेतला. मात्र तो कुठेही आढळून आला नाही. भावेश हा पत्ते खेळण्यासाठी काटेरी झाडाझुडूपात लपूनछपून चालणाऱ्या अड्ड्यावर जात असल्याचे हरिष यास माहिती होते. त्यामुळे तो भावेशचा शोध घेण्यासाठी तो याठिकाणी आला असता त्याला भिषण दृष्य दिसले. आपला लहान भाऊ रक्ताच्या थारोळ्यात मरण पावला असल्याचे त्याला दिसले. त्याठिकाणी रक्ताचे डाग आणि पत्यांच्या कॅटसह पत्ते विखुरलेल्या अवस्थेत पडलेले होते. मरण पावलेल्या रक्ताच्या थारोळ्यातील भावेशच्या गळ्यावर धारदार हत्याराचे वार त्याला दिसून आले. त्याच्या डोक्यावर देखील जोरदार हल्ला झाल्याचे त्याच्या निदर्शनास आले. लहान भाऊ भावेशचा खून झाल्याचे बघून हरिषने जोरजोरात रडण्यास सुरुवात केली. हरिषचा जोरजोरात रडण्याचा आवाज ऐकून परिसरातील लोक त्याठिकाणी जमा झाले. दरम्यान कुणीतरी या घटनेची माहिती भुसावळ तालुका पोलिस स्टेशनला दिली. माहिती मिळताच डिवायएसपी कृष्णात पिंगळे व पोलिस निरीक्षक बबन जगताप, सहायक पोलिस निरीक्षक अमोल पवार, हे.कॉ. संजय तायडे, संजय भोई आदींनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. पोलीस पथकाने लागलीच मयत भावेश भालेराव याचा मृतदेह उत्तरीय तपासणीकामी रवाना केला. सुरुवातीलाया घटनेप्रकरणी मयत भावेश भालेराव याचा मोठा भाऊ हरिष भालेराव याने दिलेल्या फिर्यादीनुसार भुसावळ तालुका पोलिस स्टेशनला अज्ञात मारेकऱ्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. भाग ५ गु.र.न. ८/२४ भा.द.वि. ३०२ नुसार दाखल गुन्ह्याचा पुढील तपास स.पो.नि. अमोल पवार यांच्याकडे सोपवण्यात आला. घटना घडली त्याठिकाणी काटेरी झाडाझुडूपात रोशन बबन हुसळे हा पत्त्यांचा अड्डा चोरुन लपून चालवत असल्याची माहिती समोर आली. त्यामुळे संशयाची सुई अर्थातच त्याच्यावर आली. पोलिस पथकाकडून त्याचा शोध सुरु करण्यात आला. दरम्यान संशयीत व फरार झालेला रोशन हुसळे हा कोपरगाव येथे पळून जाण्याच्या बेतात असल्याची गोपनीय माहिती डिवायएसपी कृष्णात पिंगळे यांना समजली. त्यांनी आपले सहकारी कर्मचारी हे.कॉ. सुरज पाटील यांना त्याचा शोध घेण्याकामी रवाना केले. दरम्यान साकरी पुलाजवळ संशयीत आरोपी रोशन हुसळे हा एका आडोश्याला उभा असल्याची गोपनीय माहिती हे.कॉ. सुरज पाटील यांना समजली. त्यांनी त्याचा माग काढत त्याला शिताफीने ताब्यात घेतले. त्याला डिवायएसपी कृष्णात पिंगळे व पोलिस निरीक्षक बबन जगताप यांच्यासमक्ष हजर करण्यात आले. त्याने आपला साथीदार आकाश परदेशी याचा देखील या खूनी हल्ल्यात सहभाग असल्याचे कबुल केले. त्यानंतर या गुन्ह्याचा सखोल तपास भुसावळ तालुका पोलिस स्टेशनचे पो.नि. बबन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक अमोल पवार यांच्याकडे आला. त्यांनी आपले सहकारी सहायक फौजदार शामकुमार मोरे, हे.कॉ. संजय तायडे, संजय भोई,वाल्मिक सोनवणे, युनुस शेख, योगेश पालवे,दिपक जाधव, जगदीश भोई, प्रेम सपकाळे, राहुल महाजन, रशिद तडवी आदींच्या मदतीने सुरु केला. अटक करण्यात आलेला संशयीत आरोपी रोशन हुसळे याच्याकडून घटनास्थळी गुन्हा घडला त्यावेळी कोणकोण पत्ते खेळणारे प्रत्यक्ष साक्षीदार होते त्यांची नावे घेण्यात आली. त्याने दिलेल्या माहितीनुसार घटनेच्या वेळी सर्व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांना बोलावण्यात आले. त्यांच्याकडून देखील घटनेची माहिती घेण्यात आली. संशयीत आरोपी रोशन हुसळे व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांकडून मिळालेल्या माहितीनुसार या घटनेत भावेश भालेराव याच्यावर चाकूहल्ला करणाऱ्या आकाश परदेशी याचे नाव पुढे आले. त्यालादेखील ताब्यात घेण्यात आले.गुन्हा कबुल केल्यानंतर आकाश परदेशी यालादेखील अटक करण्यात आली. सध्या दोघे संशयीत आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. या गुन्ह्याचा पुढील तपास डिवायएसपी कृष्णात पिंगळे व पो.नि. बबन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक अमोल पवार करत आहेत. त्यांना सहायक फौजदार शामकुमार मोरे, हे.कॉ. संजय तायडे, संजय भोई, वाल्मिक सोनवणे, युनुस शेख, योगेश पालवे, दिपक जाधव, जगदीश भोई, प्रेम सपकाळे, राहुल महाजन, रशिद तडवी आदींचे सहकार्य लाभत आहे.

## मित्राच्या प्रेयसीला पटवून तो दगाबाज...

सूरज आणि बिपीनकुमार दोघेही मूळचे उत्तर प्रदेशातील आहेत. काही वर्षापूर्वी कामाच्या शोधात ते नागपुरात आले आणि येथेच स्थिरावले. दोघेही गुन्हेगारीत सक्रिय होते. बिपीनचे प्रेमप्रकरण सुरु होते आणि त्याच्या प्रेयसीची सूरजशी मैत्री होती. गेल्या काही दिवसांपासून प्रेयसीसोबत सूरजची जवळिक वाढली होती. त्यामुळे बिपीनला दोघांवरही संशय होता. बिपीनने मंगळवारी प्रेयसीला सूरजसोबत मैत्री तोडण्यास सांगितले. मात्र, तिने मैत्री तोडण्यास नकार दिला होता. त्यामुळे बिपीनचे प्रेयसीसोबत जोरदार भांडण झाले. सूरजमुळेच प्रेयसीने अबोला धरल्याचा संशय बिपीनला होता. त्यामुळे त्याने बुधवारी सकाळी सूरजला नाईकनगर चौकात वाद मिटविण्यासाठी बोलावले होते, अशी माहिती पोलिसांनी दिली. नाईकनगर चौकात दुचाकीने सूरज पोहचताच बिपीन आणि त्याच्या साथिदारांनी त्याच्यावर कोयत्याने वार केले. जीव वाचविण्यासाठी सूरज पळायला लागला. आरोपींनीही त्याचा फिल्मीस्टाईल' पाठलाग केला. श्याम सिरसाठ यांच्या घरात शिरून मदतीसाठी धावा करायला लागला. मात्र आरोपींनीही सूरजचा गळा चिरून खून केला. शहरातून तडीपार केलेले जवळपास अर्ध्यापेक्षा जास्त गुन्हेगार शहरातच राहतात. त्यासाठी पोलीस ठाण्यातील डीबीचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना लाच देण्यात येते. सूरज बिहारी हा तडीपार आरोपी होता. मग तो शहरात कसा फिरत होता, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

## जमिनीचा वाद खूपच विकोपाला...

सुनिता हिला घेवून मोटरसायकलने कॉम्प्लेक्सजवळ आले. त्या दोघींनी पाहिले की त्यांच्या पतीला म्हणजे राजेंद्र यांना चहूबाजूने जमावाने घेरले आहे. यामध्ये चंचल भानुदास क्षिरसागर, त्याची पत्नी वैष्णवी, भाऊ विनोद, त्याची पत्नी पूनम, तसेच चंचल क्षिरसागर याची दोन मुले राज आणि साई तसेच त्याची आई बेबीबाई, वैष्णवीचा भाचा पियुष सुतार, निकीता व कशिश असे सर्व जण होते. ते सर्व जण दमबाजी करत शिवीगाळ करत होते. राजेंद्र याच्या दोन्ही पत्नी शितल आणि सुनिता यांच्यासमवेत आलेले रूपा मनिष शिंदे, रविंद्र संतोष माळी, योगेश प्रकाश सोनवणे, धोंडीराम किसन गांगुर्डे, दिनेश जगदाळे, प्रशांत थोरात आदींनी मध्यस्थी करून त्यांचेभांडण सोडवले, त्यामुळे शिवीगाळआणि दमबाजी करणारे चंचल क्षिरसागर व इतर जण त्यांच्या घराकडे निघून गेले. त्याचदिवशी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास राजेंद्र शिंदे हे पत्नी शितल व घरातील इतर लोकांसोबत जय जनार्दन कॉम्प्लेक्सजवळ उभे होते. त्यावेळी चंचल क्षिरसागर हातात लोखंडी रॉड घेऊन तर विनोद भानुदास क्षिरसागर हातात लाकडी दांडा घेवून त्यांच्याकडे आले. त्यांच्यासोबत वैष्णवी चंचल क्षिरसागर, पूनम विनोद क्षिरसागर, बेबीबाई भानुदास क्षिरसागर, राज, साई, निकिता, कशिष आणि पियुष सुतार आदी सगळेच होते. चंचल व इतरांनी राजेंद्र शिंदे याला शिवीगाळ करत 'राज्या, तुला 'जिवंत ठेवणार नाही' असे म्हणत लोखंडी रॉड, लाकडी दांड्यासहलाथा–बक्क्यांनी मारहाण सुरू केली. त्या जमावाने राजेंद्र यांना जमिनीवर पाडले आणि ते त्यांनातुडवू लागले, तेंव्हा राजूच्या पत्नी शितल, सुनिता, भावजय रूपा तसेच प्रशांत थोरात यांनी मध्यस्थी सुरू केली. ते लोक भांडण सोडवू लागले, तेंव्हा पियुष सुतार याने त्याच्या हातातील धारदार व तीक्ष्ण हत्याराने राजेंद्रच्या डाव्या– बाजूस छातीवर भोकसले. तसेच त्यांच्या डाव्या हाताच्या दंडावर व मनगटाजवळ वार करून गंभीर दुखापती केल्या, तर राज चंचल क्षिरसागर याने चाकूने राजेंद्र यांच्या डोक्यावर मध्यभागी मारून गंभीर दुखापती केल्या. प्रशांत थोरात हा त्यांचे भांडण सोडवण्यास आला असता त्यालाही पियुष सुतार याने हातातील हत्याराने पाठीवर मारून जखमी केले. धारदार हत्याराने छातीवर व डोक्यावर मारहाण करण्यात आल्याने राजेंद्र शिंदे रक्तबंबाळ होवून जमिनीवर कोसळले. त्यांच्या अंगातील कपडे रक्ताने माखले होते.राजेंद्र खाली कोसळल्यानंतर हल्लेखोर पळून गेले. त्यानंतर राजेंद्रच्या पत्नी शितल, सुनिता, भावजय रूपा, रविंद्र संतोष माळी, योगेश प्रकाश सोनवणे, प्रकाश सुकदेव सोनवणे, धोंडीराम किसन गांगुर्डे, दिनेश जगदाळे आदींनी त्यांना गाडीतून चांदवड येथील सरकारी रूग्णालयात आणले. तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासूनमयत घोषीत केले. दरम्यान या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच पोलीस अधीक्षक शहाजी उमाप, अप्परपोलीस अधीक्षक अनिकेत भारती यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सोहेल शेख, पोलीस निरीक्षक कैलास वाघ, उपनिरीक्षक भानुदास नन्हे व पोलीस कर्मचाऱ्यांनी रूग्णालयात धाव घेतली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने घटनास्थळ व मृतदेहाचा पंचनामा केला. शितल राजेंद्र शिंदे यांनीचांदवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. गुन्हा रजि.नं. १४/२०२४ भा.दं.वि. १४३,१४७,१४८,१४९,३०२,३२४,३२३,५०४,५०६ व ३४ कलमाखालीचंचल भानुदास क्षिरसागर, विनोद भानुदास क्षिरसागर, वैष्णवी चंचल क्षिरसागर, पूनम विनोद क्षिरसागर, बेबीबाई भानुदास क्षिरसागर, राज चंचल क्षिरसागर, साई चंचल क्षिरसागर, निकिता विनोद क्षिरसागर, कशिष विनोद क्षिरसागर व पियुष सतिश सुतार रा. दुगाव, ता. चांदवड अशा दहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी सर्व आरोपींना लगेच गजाआड केले. पोलीस उपनिरीक्षक भानुदास नन्हे यांच्याकडे या गुन्ह्याचा तपास देण्यात आला. राजेंद्र शिंदे व चंचल क्षिरसागर या दोघांमध्ये गेले अनेक दिवसांपासून जमिनीबाबत वाद सुरू होता. त्या वादातूनच क्षिरसागर कुटुंबाने राजेंद्र शिंदे याच्यावर हल्ला चढवत त्याचा निर्घृणपणे खून केल्याची घटना घडली.

## दोघांच्या प्रेमात तिसऱ्याची एन्ट्री ...

नेऊन प्रेमविवाह केला आणि आपले नाक कापले याचा ओकांर याला राग येत होता. तो सारखे या कारणातून वाद उकरून काढून संतोषला मारहाण करायला जात होता.त्याचे भांडण खरे तर टोकला गेले होते.तरी ही संतोष हा ओकारला समजावून सांगत होता झाले गेले विसरून जा. मी काय जगापेक्षा वेगळे केले नाही आमच्या दोघांचे एकमेकावर प्रेम होते म्हणून आम्ही पळून जावून लग्न केले त्यात तु राग मानू नकोस असे तो ओकांरला सांगत होता. परंतु ओंकारला त्याचा राग येत होता. संताष हा दुसऱ्याच्या टॅक्टरवर टॅक्टर ड्रायव्हर म्हणून काम करीत असताना परत त्याचे गावातीलच एका महिलेशी प्रेम संबंध जुळले. ती महिला ही विवाहित होती. संतोषला ती चिकटल्याने त्या दोघांचे प्रेमसंबंध फुलू लागले. ती महिला आपल्या नवऱ्याला सोडून गावात एकटीच राहत असल्याने गावातील लोक ही तिच्याकडे त्याच नजरेने पाहत होते.त्यातच त्या महिलेचे संतोषच्या अगोदर ही बाळासाहेब संजय पाटील नावाच्या तरूणाबरोबर ही संबंध होते. आता संतोष तिला चिकटल्याने ती महिला बाळासाहेब याला जवळ येऊ देत नव्हती. सावळज गावातील बाळासाहेब सधन व्यक्ती होती. त्या महिलेशी त्याचे गेल्या दोन तीन वर्षापासून संबंध होते. ती महिला आपल्या नवऱ्याबरोबर भांडून सावळज येथे आपल्या माहेरी एकटीच राहत होती.त्यामुळे तिला काय पाहिजे काय नको हे बाळासाहेब पाहत होता. एकंदर काय तर ती महिला त्याची रखेल होती. त्याचे ही तिच्यावर मनापासून प्रेम असल्याने त्याने तिला लग्नाची मागणी ही घातली. परंतु त्या तिने धडुकावून लावले. कारण त्या महिलेला अलिकडे संतोष सारखा तरणा गडी मिळाल्याने ती बाळासाहेब पाटील याला जवळ ही येऊ देत नव्हती. याचा राग बाळासाहेब पाटील याला येत होता. संतोषने आपल्या प्रकरणात मिठाचा खडा टाकल्याचे त्याला वाटू लागले. त्यामुळे तो संतोष पाटील याचे वर चिडून होता. संतोषने आपल्या विवाहित प्रियेसीला नादाला लावले आणि तिला आपल्या विरोधात काही तरी वेगळे सांगितले असावे म्हणून ती आपल्याला जवळ करीत नाही आणि आपल्याशी लग्न करायला ही तयार होत नाही असे त्याला वाटत होते. त्याचा कायमाचा काटा काढायला पाहिजे याचा त्याने मनोमन विचार केला आणि त्याने तो विचार आपला मित्र हणमंत सदाशिव वांडरे याला सांगितला.बाळासाहेब हे मिस्त्रीचे काम करीत होते तर हणमंत हा जीम प्रशिक्षीक म्हणून काम करीत होता. हणंमत वांडरे याला मित्राचे ते विवाहित संबंध माहित होते. त्यातच संतोष पाटील हा त्या महिलेला चिकटल्याचे बाळासाहेब पाटील यांनी त्याला सांगताच संतोषची गेम करण्यास तो ही तयार झाला. खरे तर बाळासाहेब हे त्या महिलेची हर एक इच्छा पुर्ण करीत होते, परंतु अलिकडे ती त्यांना टाळू लागली होती. संतोषने तिच्याशी जवळीक साधल्याने ती बाळासाहेब यांना किंमत ही देत नव्हती. त्याच्या या संबंधात प्रेमाचा त्रिकोण तयार झाला होता. इकडे अगोदरच संतोष याचे मेहुणा ओंकार पाटील बरोबर खटके उडत होते. त्यात आता बाळासाहेब पाटलांची भर पडली होती. त्या विवाहित महिलेच्या संबंधासवरून बाळासाहेब आणि त्याची भांडणे ही झाली होती. बाळासाहेब यांनी त्याला बघून घेण्याची भाषा ही केली होती. परंतु तो बाळासाहेबच्या धमकीला भीक घालणाऱ्यातील नव्हता. त्याने बाळासाहेबला तुला काय करायचे ते कर जा. मी तिला सोडणार नाही. ती माझी ही आहे. असे ठणकावून सांगितले होते. त्यामुळे बाळासाहेबांची तळपायची आग मस्तकात गेली होती. संतोष हा कधी कामावरून घरी जातो हे त्याला माहित होते. म्हणून तो आणि त्याचा मित्र हणंमत वांडरे हे त्याच्या वाटेवरच डुख धरून होते. बुधवार दि.७ फेब्रुवारी रोजी रात्री आठ वाजणेच्या सुमारास सावळज बिरनवाडी रस्त्याने संतोष हा मळ्याकडील घराकडे येत होता. घराकडे येणारा रस्ता हा कच्चा असल्याने रात्रीच्या अंधारात तो मोटार सायकल हळूहळु चालवित होता. त्याच वेळी त्याच्या मागून अंधारात दुसऱ्या एका मोटार सायकलीने बाळासाहेब पाटील आणि हणमंत वांडरे हे आले. रात्रीच्या अंधारात त्यांनी त्याची दुचाकी गाडी संतोषच्या दुचाकीच्या आडवी लावून त्याची गाडी थांबवली. हणंमत याने संतोष याची गाडी थांबवून माझ्या गाडीतील पेट्रोल संपले आहे. जरा तुझ्या गाडीतल पेट्रोल काढून दे.असे सांगितले. संतोष हा त्या दोघांना ही ओळखत होता. परंतु त्याच्या मनात त्या दोघाविषयी काही नसल्याने तो खाली वाकून आपल्या गाडीतील पेट्रोलची पाईप काढून त्यांनी आणलेल्या बाटलीत पेट्रोल काढत असताना बाळासाहेब याने वाकलेल्या संतोषच्या डोक्याच्या मागील बाजूस लोखंडी रॉडने जोरदार वार केला. त्यासरशी संतोष हा तडफडत खाली ओरडत पडला. डोक्यावर लोंखडी रॉडचा जोरदार वार बसल्याने त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्त स्त्राव होऊ लागला. त्यात तो गंभीर रित्या जखमी झाला. हे बघून परत हणंमतने त्याच लोखंडी रॉडने त्याच्या अंगावर जोरदार फटका लावीत बाळासाहेबने ठेवलेल्या बाईकडे जाशील का? साल्या तुझ्यामुळे ती बाई बाळसाहेबांना जवळ घेत नाही आणि तु तिच्याबरोबर मज्जा मारतोस काय? असे म्हणत परत त्याच्या डोक्यात त्याच रॉडने वार केला. त्यासरशी संतोष हा रक्ताच्या थारोळ्यात जागेवर पडला. तो आपला हातून मेला आहे याची खात्री करून ते दोघे ही आलेल्या वाटेने निघून गेले. बराच वेळ बाहेर गेलेला संतोष हा रात्री उशिरा पर्यत घराकडे परत न आल्याने त्याची आई वैशाली पाटील आणि संतोषची बायको त्याचा शोध घेण्यासाठी घराबाहेर पडले असता त्यांना संजय पवार याच्या घराशेजारील रस्त्यावर त्याची मोटार सायकल पडलेली दिसली. तर मोटार सायकलीच्या थोडया अंतरावरील कच्चा रस्त्यावर संतोष हा रक्ताच्या थारोळयात पडल्याचे दिसले. हे बघून त्या दोघीनी आरडा ओरडा करायला सुरूवात केल्यावर मळ्यातील लोक आवाजाच्या दिशेने पळत आले. जखमी संतोषला एका वाहनात घालून उपचारासाठी तासगाव येथील सरकारी दवाखान्यात आणले. परंतु तेथील उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी त्यांना सांगितले. संतोषच्या खूनाची बातमी संपुर्ण सावळज गावात पसरली कुणी तरी या घटनेची माहिती तासगाव पोलीसांना दिल्यावर पोलीस ही घटनास्थळी तातडीने दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेहाचे शवविच्छेदन तासगाव येथील सरकारी दवाखान्यात केले. या घटनेची लेखी फिर्याद मयत संतोष पाटील याची आई वैशाली पाटील यांनी तासगाव पोलीसात देऊन संशयीत म्हणून नात्यातील ओकार शिवाजी पाटील आणि अन्य चार जणावर संशय घेतला. अडीच वर्षापूर्वी नात्यातील मुलीशी संतोषने प्रेम विवाह केल्याने ओंकार पाटील आणि त्याचे नातेवाईक संतोषवर चिडून होते त्यातूनच त्यांनी संतोषचा खून केला असल्याचे त्यांनी आपल्या फिर्यादीत म्हटले. त्याच्या फिर्यादीवरून तासगाव पोलीसांनी ओंकार पाटील आणि अन्य तिघांना ताब्यात घेऊन तासगाव पोलीस स्टेशनला आणले. तेथे त्याच्याकडे संतोषच्या खूनाविषयी चौकशी केली असता त्या चौकशीत संतोष पाटील याच्या खूनात ओंकार पाटील किंवा त्याच्या नात्यातील कोणाचा हात नसल्याचे पुढे आले. पोलीसांनी त्याच्या घराची झडती ही घेतली परंतु यातून ही काही ठोस पुरावा पोलीसांच्या हाती लागला नाही. या आरोपीनी संतोषचा खून त्यांनी केला नाही हे त्यांनी पोलीसाना पटवून सांगितले, त्यामुळे पोलीसांचा त्याचेवरील संशय कमी झाला. मग संतोषचा खून कुणी आणि कशासाठी केला याचा तपास तासगाव पोलीस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस करीत होते. या घटनेला सुमारे आठ दिवस झाले. तरी ही खरे संशयीत आरोपी पोलीसांना सापडत नव्हते. या घटनेच्या तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेची दोन पथके कार्यरत होती. पो.निरी दिपक भांडवलकर पोलीस फौजदार कुमार पाटील यांना या घटनेविषयी वेगळीच माहिती मिळाली. संतोषचा खून हा विवाहबाहय संबंधातील नाजूक प्रकरणातून झाल्याचे त्यांना समजले. तसेच या घटनेतील संशयीत आरोपी हे सावळज येथील जीममध्ये असल्याची माहिती मिळाल्यावर पोलीसांनी या जीममध्ये जावून या घटनेतील संशयीत आरोपी बाळासाहेब पाटील आणि हणंमत वरांडे यांना ताब्यात घेतले. त्याच्याकडे पोलीसांनी चौकशी केली असता त्यांनी आपणच संतोष पाटील याचा खून केल्याचे मान्य केले. हा खून त्यांनी बाळासाहेब पाटील यांनी ठेवलेल्या बाईच्या संबंधातून केल्याचे त्यांनी मान्य केले. या घटनेची फिर्याद मयत संतोष पाटील याची आई वैशाली संजय पाटील रा.सावळज यांनी तासगाव पोलीसात दिली असल्याने त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी संतोष संजय पाटील (२९) रा.सावळज याच्या खून प्रकरणी बाळासाहेब संजय पाटील (२८) आणि हणमंत सदाशिव वांडरे (२८) रा.दोघे सावळज याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून या दोघांना पोलीसांनी तासगाव येथील कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली दुचाकी बाईक आणि लोखंडी रॉड जप्त केला. या घटनेचा तपास तासगाव पोलीसाबरोबरच स्थानिक गुन्हे अन्वेषनचे पोलीसांनी करून संशयीत आरोपीना ताब्यात घेतले. विवाहबांहय संबंधात दोघात तिसऱ्या व्यक्तीची एन्ट्री झाली की त्या प्रेम त्रिकोणाचा विस्कोट होतो हेच या घटनेवरून दिसून येते.

19 TO 25 FEBRUARY 2024 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 2/18/2024 8:25 PM Page 1



# कुडूसमध्ये राष्ट्रीय नाभिक संघटनेचा नाभिक मेळावा

**वाडा/प्रतिनिधी**



राष्ट्रीय नाभिक संघटना वाडा तालुक्याच्या वतीने भव्य नाभिक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याच्या सुरवातीला संपूर्ण कुडूस शहरांमध्ये पायी रॅली काढून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली तसेच नाभिक समाजाचे शिव व्याख्याते अमर राउत यांचे मंत्रमुग्ध करणारे शिवव्याख्यान सादर करण्यात आले त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून मुख्य कार्यक्रमाची सुरवात झाली. त्या कार्यक्रमाची प्रस्तावना पालघर जिल्हाचे जिल्हाध्यक्ष मनोज जाधव यांनी केली नाभिक समाजाचा असलेला इतिहास व आज समाजाच्या अस्तित्वासाठी सुरु असलेला लढा व भविष्यात करावी लागणारी लढाई याबाबत मार्गदर्शन राष्ट्रीय नाभिक संघटनेचे सोलापुर जिल्हाध्यक्ष किरण भांगे यांनी केले. नाभिक समाजानी एकत्र राहील्याने समाजाच कस हित आहे याबाबत अमूल्य अस मार्गदर्शन संघटनेचे राष्ट्रीय सरचिटणीस महेंद्र जाधव यांनी केले. या कार्यक्रमात महाराष्ट्र केश शिल्प महामंडळावर महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पदासाठी राष्ट्रीय नाभिक संघटनेचे राष्ट्रीय सरचिटणीस महेंद्र जाधव यांचा ठराव घेण्यात आला तसेच केंद्र सरकारने नाभिकरत्न व बिहारचे मुख्यमंत्री राहिलेले कर्पूरी ठाकुर यांना भारतरत्न दिल्याबद्दल केंद्र सरकार आभार व्यक्त करण्याचा ठराव घेण्यात आला वाडा तालुक्यातील झालेल्या या मेळाव्याला राष्ट्रीय नाभिक संघटनेचे अध्यक्ष अरुण जाधव, सरचिटणीस महेंद्र जाधव, कोकण विभागीय अध्यक्ष हरीश राऊत, कोकण विभागीय महिला अध्यक्ष सोनाली चव्हाण, ठाणे जिल्हा अध्यक्ष सुनंदा आमोदकर, ठाणे जिल्हा अध्यक्ष भरत राऊत, सोलापूर जिल्हा युवक अध्यक्ष किरण भांगे, केळठन ग्रामपंचायतीच्या सरपंच पुष्पा चातुर्य पुंडास ग्राम.सरपंच मनिषा पवार ठाणे जिल्हा उपाध्यक्ष मोतीलाल बिरारी, मार्गदर्शक समाजसेवक ज्ञानेश्वर पवार, भिकाजी सकपाळ, लहुजी शिंदे, अविनाश सोनवणे, विलास शिंदे, सत्यवान सापने, संतोष गायकवाड, एस.के. गायकवाड, बाळकृष्ण वाघ, ताटे मॅडम, खैरे ग्राम. सदस्य अल्पेश पांडव, तसेच राष्ट्रीय नाभिक संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन प्रदेश सचिव तुषार भोईर, पालघर जिल्हाध्यक्ष मनोज जाधव, ठाणे पालघर विभाग अध्यक्ष रामचंद्र भोईर, सरचिटणीस बबन भोईर, शासकीय कर्मचारी जिल्हाध्यक्ष भूपेंद्र चातुर्य, वाडा तालुकाध्यक्ष आतिष जाधव, महिला तालुकाध्यक्ष रुपाली भोईर, कुडूस विभाग अध्यक्ष राजेश जाधव, तालुका कार्याध्यक्ष सचिन भोईर, रविंद्र जाधव, सुमित भोईर, विशाल जाधव, स्वाती निकम, स्वप्निल जाधव, जगदीश आगाशे, दिनेश जाधव, ओंकार जाधव, तेजस जाधव, गणेश जाधव तसेच वाडा तालुका वाडा शहर व पालघर जिल्ह्यातील इतर पदाधिकारी यांनी आयोजित केला होता.

# गुरांची चोरटी वाहतुक करणारा टेम्पो जप्त

**वाडा/प्रतिनिधी**




कत्तल करण्यासाठी बेकायदेशीर गुरांची वाहतूक करणारी महिंद्रा टेम्पो वाडा पोलिसांनी जप्त केला असून यातील सहा मोठे व तीन लहान गोवंशाची सुटका करण्यात आली आहे.तर टेम्पो चालकास तब्यात घेण्यात आले आहे. वाडा पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार पोलीस उपनिरीक्षक गनेश तारगे हे आपल्या कार्यक्षेत्रात रात्रीच्या सुमारास गस्त घालत असताना एक सफेद रंगाचा महिंद्रा कंपनीचा टेम्पो (एमएच ४८ बीएम ०४३२) पालीहून वाड्याच्या दिशेन भरधाव वेगाने जात असतांना त्याला थांबण्याचा प्रयत्न केला तरी तो न थांबता निघून घेल्याने पोलिसांना संशय आला दरम्यान त्याचा पाठलाग करून अखेर पोलिसांनी त्याला गाठले व चौकशी केली असता तो उडवा उडवीचे उत्तरे देत होता म्हणून टेम्पो वाडा पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली असता ही जनावरे चोरीची असून ते येथे विक्रीसाठी नेत असल्याचे वाहन चालक उन्मेश गायकवाड रा.विक्रमगड याने सांगितले. सदर प्रकरणी तुषार भरसट पोलिस जीप चालक यांच्या फिर्यादीवरून सहा.फौजदार दयानंद पाटील, पोशी. हरेश काळे, दिलीप ढमके यांनी कारवाई केली. पोलीस निरीक्षक रणवीर बयेस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश तारगे अधिक तपास करत आहेत.

# आयएमएच्या मिशन पिंक हेल्थच्या माध्यमातून किशोरवयीन मुलींसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन

**लातूर/प्रतिनिधी**




इंडियन मेडिकल असोसिएशन अर्थात आयएमएच्या मिशन पिंक हेल्थच्या माध्यमातून विद्यालयीन तसेच महाविद्यालयीन मुलींसाठी आरोग्य विषयक मार्गदर्शन शिबिरांचा उपक्रम मिशन पिंक हेल्थच्या अध्यक्षा डॉ.वृंदा कुलकर्णी व त्यांच्या सहकारी तज्ज्ञ महिला डॉक्टर्सच्या कुशल नेतृत्वाखाली अत्यंत यशस्वीरीत्या राबविण्यात आला. मकर संक्रमणाच्या काळात महिला वेगवेगळ्या प्रकारचे वाण लुटतात. परंतु मिशन पिंक हेल्थच्या महिला डॉक्टर्सनी कर्तव्यभावनेने विद्यालयीन तसेच महाविद्यालयीन किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य विषयक मार्गदर्शनाच उपक्रम अत्यंत व्यवस्थितरीत्या राबविला. मिशन पिंक हेल्थच्या अध्यक्षा डॉ. वृंदा कुलकर्णी यांनी यासंदर्भात विस्तृत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, विवेकानंद विद्यालय (गंगापूर), जवाहर नवोदय शाळा, सरस्वतीदेवी आश्रमशाळा (चिंचोलीराव वाडी), जिजामाता कन्या शाळा व दयानंद कनिष्ठ वाणिज्य विद्यालय या सर्व संस्थांमधील जवळपास १४०० किशोरवयीन विद्यार्थिनी व विद्यार्थी तसेच ३५० माता पालकांना आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले. मासिक पाळी, त्यातील समस्या, मासिक पाळीत घ्यावयाची स्वच्छता, रक्तक्षय (एनिमिया) व योग्य आहार, समाजमाध्यमे व त्याचे दुष्परिणाम, चांगला व वाईट स्पर्श यातील फरक याबाबत मुलींना, महिलांना सविस्तर माहिती देण्यात आली. त्यांच्या विविध शंकांचे व समस्यांचे निरसनही करण्यात आले. या अभिनव उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्षा डॉ.वृंदा कुलकर्णी, सेक्रेटरी डॉ. रचना जाजू, डॉ. सुरेखा काळे, डॉ.अमृता पाटील, डॉ. कल्पना किनीकर, डॉ. सगीर पठाण या स्त्रीरोग तज्ञांनी हे मार्गदर्शन केले. कार्यक्रम आयोजित करण्यात डॉ.वृंदा कुलकर्णी, डॉ. सुरेखा काळे, डॉ. कल्पना किनीकर, डॉ. स्नेहल देशमुख यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी लातूर आयएमएचे अध्यक्ष डॉ. अनिल राठी, सचिव डॉ. चेपूरे तसेच संपूर्ण आयएमए परिवाराचे सहकार्य लाभले.

# भिवंडीत उड्डाण पुलावरील हाईट बॅरिकेटिंगला दोन दिवसात दोन वाहनांची धडक

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी शहरातील मुख्य रस्त्यावरील स्वर्गीय राजीव गांधी उड्डाणपुल व व स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूलावर अवजड वाहनांना बंदी आहे. त्यासाठी या दोन्ही मुख्य रस्त्यांवरील उड्डाणपूलांवर हाईट बॅरिकेटिंग लावण्यात आले आहेत.परंतु रात्रीच्या अंधारात अथवा पहाटेच्या वेळी हे हाईट बॅरिकेटिंग दिसून न येत असल्याने अनेक वेळा वाहनांची धडक बसल्याने दुर्घटना घडल्या असतानाच स्वर्गीय राजीव गांधी पुलावरा रामेश्वर मंदिरा कडील बाजूस लावलेल्या हाईट बॅरिकेटिंगला सतत दोन दिवसात दोन अज्ञात वाहनांनी धडक दिल्याने लोखंडी बॅरिकेट कोसळण्याची दुर्घटना घडली. सुदैवाने या मध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही.बुधवारी पहाटे वाहनाने धडक दिल्याने संपूर्ण बॅरिकेटिंग कोसळली होती त्यानंतर तात्पुरते बांबू बांधून काम सुरू ठेवले व सायंकाळी पुन्हा बॅरिकेटिंग वेल्डिंग करून लावण्यात आले पण गुरुवारी पहाटे पुन्हा एका अज्ञात वाहनाने धडक देण्याची घटना घडली आहे. या उड्डाण पुलावरील हाईट बॅरिकेटिंगला यापूर्वी अनेक वेळा वाहनांनी धडक दिल्याने दुर्घटना घडल्या आहेत. त्यानंतर ही पालिका प्रशासन व वाहतूक पोलीस यांनी या ठिकाणी कोणतीही खबरदारी घेतली नाही हे विशेष.हाईट बॅरिकेटिंग असलेल्या ठिकाणी दिवस रात्र सुरू राहणारी रेड लाईट व रिफ्लेक्टर लावणे गरजेचे आहे जेणे करून नवीन वाहन चालकाच्या लक्षात या रस्त्यावरील हाईट बॅरिकेटिंग येतील परंतु ती काळजी प्रशासनाने कधी घेतलीच नाही.या ठिकाणी कोणाचा जीव गेल्यावर प्रशासनाला जाग येणार का असा सवाल नागरीक विचारीत आहेत.

# भिवंडीत भंगार गोदामाला भीषण आग; आगीत वाहने जळून खाक



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरालगतच्या ठाकराचा पाडा येथील भंगार गोदामाला लागलेल्या भीषण आगीत गोदाम व नजीक असलेल्या वाहन पार्किंग मधील अनेक वाहनांना झळ लागल्याची घटना घडली आहे. ठाकराचा पाडा येथील रस्त्यालगत एका मोकळ्या जागेत भंगार साठवणुकीचे गोदाम असून गुरुवारी दुपारी चार वाजताच्या सुमारास येथे अचानक आग लागली. या आगीत भंगार गोदामात साठवलेले काही केमिकल जळत असल्याने ही आग झपाट्याने पसरत नजीकच असलेल्या वाहनतळ व नजीकच्या बंगल्यापर्यंत पोहचली. या घटनेची माहिती मिळताच भिवंडी पालिकेची एक अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली. परंतु तो पर्यत ही आग पसरत गेली. स्थानिकांनी बंगल्यातील नागरिकांना सुरक्षित बाहेर काढले व त्यानंतर अनेक वाहन उचलून बाजूला काढण्याचा प्रयत्न केला. या मध्ये एक जीप, दोन ट्रक, चार दुचाकी आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या आहेत. दरम्यान या दुर्घटने नंतर घटनास्थळी एकमात्र अग्निशामक दलाची गाडी पोहचल्याने माजी नगरसेवक कमलाकर पाटील यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. घटनास्थळी अग्निशामक दलाचे एकच गाडी आल्याने नागरिकांनी नापसंती व्यक्त केली असताना या बाबत वर्दी वर असलेल्या अग्निशामक दलाच्या जवानां कडे चौकशी केली असता तीन वाहन बंद असल्याने व शहरात एक वाहन ठेवणे बंधनकारक असल्याने एकच गाडी घटनास्थळी आल्याची माहिती नाव न सांगण्याच्या अटीवर दिली आहे. पालिकेच्या ताफ्यात मागील एका वर्षातच दोन जंबो अग्निशामक दलाची वाहन दाखल झाली असताना ती सुध्दा बंद कशी असा सवाल उपस्थित होत आहे.



# भिवंडीत मातीच्या मडक्याच्या दुकानाला आग

**भिवंडी** : भिवंडी शहरातील आदर्श पार्क येथील मातीची मडकी विकणाऱ्याच्या दुकानाला सायंकाळी अचानक भीषण आग लागण्याची घटना घडली आहे. या आगीत त्यालगत असलेल्या झोपडीत असलेला छोटा सिलेंडरचा स्फोट झाल्याने आग पसरली. दरम्यान त्यावेळी या परिसरात निजामपूर पोलिसांची गस्त सुरू असल्याने त्यांनी तात्काळ या घटनेची माहिती भिवंडी अग्निशामक दलाला दिली. त्यांनी तातडीने घटनास्थळी दाखल होत आगीवर एक तासात नियंत्रण मिळवले आहे. मातीची मडकी विकण्या साठी बनवलेले छप्पर ताडपत्री चे असल्याने आग भडकत गेल्याने तेथील छोटा सिलेंडरचा स्फोट झाला, पण यामध्ये कोणीही जखमी नसल्याची माहिती स्थानिक निजामपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष आव्हाड यांनी दिली आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार, जि. पालघर**

**ऑफ लाईन निविदा सूचना क्र.५६ सन २०२३-२४**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार हे खालील कामांच्या बी-१ नमुन्यातील (ऑफ लाईन) सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम खात्याकडील **योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून** खालील कामांकरीता मागवित आहेत. कोरे निविदा नमुन्याची विक्री कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार येथे खालील दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत करण्यात येईल. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, जव्हार हे भरून पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

टिप : सदर निविदा सुचनेमध्ये एकूण १० (दहा) कामे समाविष्ट आहेत. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांचे कार्यालयातील सूचना फलकावर सदरची ऑफ लाईन निविदा पाहावयास मिळेल.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची मुळ किंमत रु. लक्ष | इसारा रक्कम रुपये | नोंदणी वर्ग | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आसे आश्रमशाळा ते करोळी रस्त्यालगत वळणावर संरक्षण भिंत बांधणे. ग्रामा-०७, ता. मोखाडा, जि. पालघर | ८,१६,५३२.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०५४ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४११७-५३ जनजाती क्षेत्र |
| २. | ओसरविरा आंब्याचापाडा कुडवा रस्त्यालगत वळणावर संरक्षण भिंत बांधणे. ग्रामा-०१०, ता. मोखाडा, जि. पालघर | ८,१९,८१७.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०५४ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४११७-५३ जनजाती क्षेत्र |
| ३. | करोळी ते कुडवा रस्त्यालगत वळणार संरक्षण भिंत बांधणे. ग्रामा-०४, ता.मोखाडा, जि.पालघर | ८,१९,५४४.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०५४ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४११७-५३ जनजाती क्षेत्र |
| ४. | प्रजिमा-२० ते कळमगांव रस्त्यालगत वळणावर संरक्षण भिंत बांधणे. ग्रामा-१६, ता.मोखाडा, जि. पालघर | ८,१७,११७.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०५४ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४११७-५३ जनजाती क्षेत्र |
| ५. | कुंडाचापाडा ते भोवाडी रस्त्यालगत वळणावर संरक्षण भिंत बांधणे. ग्रामा-१४, ता. मोखाडा, जि. पालघर | ८,१९,८५९.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०५४ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४११७-५३ जनजाती क्षेत्र |
| ६. | रा.म. मार्ग १६० अ ते मोऱ्हांडा रस्त्यालगत वळणावर संरक्षण भिंत बांधणे. ग्रामा-२७. ता. मोखाडा, जि. पालघर | ८,१७,११७.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०५४ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४११७-५३ जनजाती क्षेत्र |
| ७. | इजिमा-४५ ते दापटी रस्त्यालगत वळणावर संरक्षण भिंत बांधणे. ग्रामा-०२, ता. मोखाडा, जि. पालघर | ८,१९,२७१.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०५४ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४११७-५३ जनजाती क्षेत्र |
| ८. | धामणशेत ते पेंडक्याचीवाडी रस्त्यालगत वळणावर संरक्षण भिंत बांधणे. ग्रामा-७६. ता. मोखाडा, जि. पालघर | ८,१९,९०२.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०५४ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४११७-५३ जनजाती क्षेत्र |
| ९. | बेहेटवाडी ते पेंडक्याचीवाडी रस्त्यालगत वळणावर संरक्षण भिंत बांधणे. ग्रामा-७८ ता. मोखाडा, जि. पालघर | ८,१९,६२९.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०५४ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४११७-५३ जनजाती क्षेत्र |
| १०. | आडोशी ते खोडाळा रस्त्यालगत वळणावर संरक्षण भिंत बांधणे. ग्रामा-४३. ता. मोखाडा, जि. पालघर | ८,१८,९९८.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०५४ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४११७-५३ जनजाती क्षेत्र |

**निविदा उपलब्ध कालावधी – दिनांक : १५/०२/२०२४ ते दिनांक : २९/०२/२०२४ पर्यंत**
**निविदा स्विकृतीचा – दिनांक : ०१/०३/२०२४ (दुपारी १४.०० वाजेपर्यंत)**
**निविदा उघडणे (शक्य झाल्या) – दिनांक : ०४/०३/२०२४ (११.०० वा. शक्य झाल्यास)**

टिप :-
१. ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
२. कोणतीही एक अथवा सर्व निविदा कसलेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार खालील स्वाक्षरी करणार यांनी राखून ठेवला आहे.
३. ठेकेदाराने कोरे निविदा नमुने पोष्टाने मागविल्यास ठेकेदारांच्या जबाबदारीवर पाठविले जाईल. त्यास विलंब झाल्यास खाते जबाबदार राहणार नाही. त्यासाठी रु. २००/- जादा आकार पडेल.

**जा.क्र.: सा.बां.वि./जव्हार/निविदा/१३६६**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार
जिल्हा पालघर पिनकोड ४०१ ६०३
फोन नं. ०२५२०-२२२२३६
दिनांक : ०७/०२/२०२४

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**जव्हार, जि. पालघर**

**विमाका/कोवि/२०२३-२०२४/३६९**

19 TO 25 FEBRUARY 2024 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 2/18/2024 8:26 PM Page 1



# कर्म दरिद्री विरोधक!

या देशावर गोऱ्या इंग्रजांनी दीडशे वर्ष राज्य केले. देश स्वातंत्र्य झाला, पण या स्वतंत्र देशातील नागरिकांची आज काय अवस्था आहे, याचा कधी कुणी विचार केला आहे का? ब्रिटिश जरी या देशातून गेले, तरी गुलामी कायम आहे. पूर्वी गोऱ्या इंग्रजांची गुलामी करीत होतो, आज काळया इंग्रजांची गुलामी करण्याची पाळी आली आहे. आणि याला कारणीभूत या देशातील लोकच आहेत. स्वातंत्र्याच्या लढ्यात लाखो हुतात्म्यानी बलिदान देऊन स्वातंत्र्य मिळवलं. परंतु मिळवलेले स्वातंत्र्य टिकवण्याची जबाबदारी ज्या १४० कोटी लोकांवर होती, ते अंध भक्त आणि नालायक निघाले .त्यामुळे देश आजही हुकूमशहांच्या अधिपत्याखाली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५० पासून १९१३ पर्यंत, या देशात निश्चितपणे लोकशाही होती. आणि ही लोकशाही सर्वधर्मसमभावामुळे टिकून होती. पण आज मात्र एका विशिष्ट धर्माचे लोक, या लोकशाही वर हावी होऊन इतर धर्मीयांचे अस्तित्व नाकारत आहेत . त्यांना दुय्यम दर्जाची वागणूक देण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा स्थितीत लोकशाहीतील एक महत्त्वाचा स्तंभ म्हणून ओळखलां जाणारा विरोधी पक्ष विखुरलेला आहे. आणि त्याचा फायदा केंद्रातील मोदी सरकारला मिळत आहे. मोदी सरकारच्या विरोधात विरोधी पक्षांच्या आत्तापर्यंत ज्या ज्या आघाड्या निर्माण झाल्या, त्या सर्व कुचकामी ठरल्या. त्यामुळे या देशात सत्ताधारी पक्षाकडून अप्रत्यक्षरीत्या हुकूमशाही सुरू आहे. लोकांना महागाई, भ्रष्टाचार, महिलांची सुरक्षा, बेरोजगारी आदी मुद्द्यांपासून भटकवण्यासाठी, देव धर्म, आस्था या सगळ्यांमध्ये गुंतवले जात आहे.वास्तविक अशावेळी लोकांना वास्तवतेची जाणीव करून देण्याची जबाबदारी विरोधी पक्षाची होती. पण आज विरोधी पक्ष एक संघ नाही. काही महिन्यांपूर्वी मोदींच्या विरोधात इंडिया आघाडी स्थापन झाली होती. पण ही इंडिया आघाडी वर्षभर ही टिकू शकली नाही. त्याचे मुख्य कारण या आघाडीतील सर्वच पक्ष हे फुटीर होते. कुठल्या ना कुठल्या पक्षातून फुटून आलेले होते. आणि त्यांना आघाडीपेक्षा स्वतःच्या पक्षाचा विस्तार करण्याची अधिक घाई होती. त्यामुळे ही आघाडी टिकू शकली नाही. आणि अशा आघड्यामध्ये, नितीश कुमार आणि शरद पवार सारखे लोक असेपर्यंत, सत्ताधारी पक्षाच्या विरोधातली, विरोधी पक्षाची कुठलीही आघाडी टिकू शकत नाही. हे वास्तव आता लोकांनाही कळून चुकलेले आहे . इंडिया आघाडी २६ पक्ष होते. परंतु त्या प्रत्येक पक्षाचा एक स्वतंत्र अजेंडा होता. आणि इंडिया आघाडीत राहून त्यांना तो अजेंडा कायम ठेवायचा होता. परंतु राजकारणात असे चालत नाही. ज्यावेळी वेगवेगळ्या विचारांचे लोक आणि त्यांचे पक्ष एकत्र येतात, त्यावेळी आपल्या पक्षाची आयडीओलॉजी बाजूला ठेवून, आघाडीचा धर्म आणि धोरण पाळायचे असते. पण २६ पक्षांच्या इंडिया आघाडीत जे लोक सामील झालेले होते , त्यांनी इंडिया आघाडीचा धर्म पाळण्याऐवजी आपल्या पक्षाचे वेगळे अस्तित्व कसं टिकून राहील, याकडे अधिक लक्ष दिले. त्यामुळेच इंडिया आघाडी टिकू शकली नाही. इंडिया आघाडीतून जेव्हा विरोधाचे सूर उमटायला लागले, तेव्हाच लोकांना कळून चुकले की या आघाडीचे आता काही खरे नाही. मग अशा बेभरोषाच्या लोकांवर जनतेने कितपत विश्वास ठेवायचा हा खरा प्रश्न आहे. केंद्रात आणि देशाच्या अनेक राज्यांमध्ये असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या सरकारमधील लोकांनी, कशाप्रकारे उच्छाद मांडला आहे ते सर्वांना ठाऊक आहे. पण जे लोक समजदार आहेत, जे लोक शांततेने जगू इच्छितात, जे धर्म आणि आस्था याच्या पलीकडे जाऊन देशाचा विचार करतात. असे लोक आज हतबल आहेत. कारण एकीकडे सत्ताधारी पक्षाची मनमानी सुरू आहे. तर दुसरीकडे विरोधी पक्ष सक्षम नसल्याने लोकांसमोर दुसरा पर्याय नाही. अशा स्थितीत २०२४ च्या निवडणुकीत विरोधी पक्षाचे अस्तित्वच नसल्यामुळे, लोकसभेची निवडणूक पुन्हा बहुमताने जिंकण्याचा मोदी सरकारचा मार्ग मोकळा झालेला आहे. वास्तविक आज विरोधी पक्षाकडे जर ताकत असती आणि विरोधी पक्ष एक संघ असता, तर २०२४च्या लोकसभा निवडणुकीत सत्ता परिवर्तन अशक्य नव्हते. याचे कारण मोदी सरकारने जे काही एकतर्फी निर्णय घेतलेले आहेत, त्याला लोकांचा विरोध आहे. देशाचा अन्नदाता म्हणून ओळखला जाणारा शेतकरी ,आज रस्त्यावर उतरून आक्रोश करतोय. परंतु त्याचा आक्रोश ऐकला जात नाही. कारण सरकारकडे बहुमत आहे. आणि बहुमतातल्या सरकारच्या विरोधात, कुणी कितीही, काही केलं, तरी त्यांचे चालू शकत नाही. शेतकऱ्यांचा हाच आक्रोश जर विरोधी पक्षाने योग्यरीत्या कॅश केला असता, तर देशाच्या ग्रामीण भागात मोदी आणि त्यांच्या भाजपाची प्रचंड पीछेहाड झाली असती. कारण आजही या देशात शेतकऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. आणि त्यांनी जर ठरवलं तर ते सहज सत्तांतर घडवून आणू शकतात. परंतु त्याना एकत्र आणण्यासाठी, आणि त्यांचा आवाज बनण्यासाठी, विरोधी पक्षाकडे एक संघ ताकत नाही. याला कारणीभूत इंडिया आघाडीतला कुठलाही एक पक्ष नाही, तर जे प्रमुख पक्ष आहेत ते सगळेच कारणीभूत आहेत. ममता बॅनर्जी आणि आम आदमी पक्ष काँग्रेसचे अस्तित्वच मानायला तयार नाहीत. तर काँग्रेसही विरोधी पक्षातील लोकांना विश्वासात घ्यायला तयार नाही. काही महिन्यांपूर्वी देशात ज्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका झाल्या, त्या निवडणुकांमध्ये इंडिया आघाडीतील सर्व पक्ष एकमेकांच्या विरोधात लढले. जर तुम्ही एकत्र आलेला आहात, तर मग एकमेकांच्या विरोधात का लढत आहात? हाच खरा प्रश्न आहे. प्रत्येक पक्षाची कुठल्या ना कुठल्या राज्यात ताकत आहे. पण त्या ताकदीचा फक्त स्वतःसाठी वापर करून घेणे चुकीचे आहे. आम आदमी पक्षाची दिल्लीत मोठी ताकद आहे. आम आदमीने दिल्लीमध्ये दोन वेळेच्या विधानसभा निवडणुकीत, मोदी आणि त्यांच्या पक्षाला अक्षरशा पळता भुई थोडी केली होती. तोच प्रकार पश्चिम बंगालमध्ये आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसची मोठी ताकत आहे .आणि ही ताकत ममताने अनेक वेळा भाजपाला दाखवून दिलेली आहे. परंतु ममता असो की केजरीवाल असो, हे लोक काँग्रेसला मानायला तयार नाहीत .तर उत्तर प्रदेशात समाजवादी पक्ष काँग्रेस पासून दूर राहण्याचा प्रयत्न करतोय. महाराष्ट्रात बाबत बोलायचं झाल्यास, शरद पवार यांच्यावर त्यांच्याच आघाडीतल्या लोकांचा विश्वास नाही. अशा परिस्थितीमध्ये इंडिया आघाडी कशी एकत्र राहणार? इंडिया आघाडीसाठी सुरुवातीला प्रयत्न करणारे नितीश कुमार पुन्हा एकदा एनडीए मध्ये गेले. आणि तेही केवळ सत्तेसाठी! शरद पवार यांच्या बाबतीत ही काही वेगळे नाही. सोनिया गांधींच्या विदेशी पणाचा मुद्दा उपस्थित करून त्यांनी काँग्रेस सोडली होती. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादीची स्थापना केली. परंतु काही महिन्यातच त्यांनी महाराष्ट्रात काँग्रेसबरोबर आघाडी करून सरकार बनवले. सत्तेसाठी हे लोक काहीही करू शकतात अशा लोकांवर जनतेने कसा आणि का विश्वास ठेवावा? अर्थात आजकाल इथेच करायचे आणि इथेच भरायचे शरद पवारांनी. जे पेरले त आज उगवताना दिसत आहे. शरद पवारांनी त्यावेळी संपूर्ण काँग्रेस हायजेक करण्याचा प्रयत्न केला आज त्यांच्या पुतण्याने शरद पवारांची राष्ट्रवादी हायजेक् केली. आज महाराष्ट्रात जे काही सुरू आहे ते लोकशाहीला काळीमा फासणारे आहे. दुसऱ्याचे पक्ष फोडायचे आणि सरकार बनवायची हा प्रकार अत्यंत निंदनीय आहे. पण तो रोखण्यासाठी सक्षम विरोधी पक्षाची आवश्यकता होती. महाराष्ट्रात महाविकास आघाडी असाच एक पर्याय ठरू शकली अस्ती. परंतु भाजपातल्या काही दलालानी शिवसेना आणि राष्ट्रवादी फोडून संपूर्ण विरोधी पक्ष आणि विरोधी पक्षाची महाविकास आघाडी कमकुवत करून टाकली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे फुटी नंतर आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय बहुमताच्या जोरावर व्हायला लागला. असे असेल तर मग कुणीही कुठल्याही राज्यात सत्ताधारी पक्षाचे आमदार फोडून, ते सरकार पाडू शकतो. आणि आपले सरकार बनवू शकतो. भारतीय लोकशाहीसाठी हा अत्यंत संताप जनक प्रकार आहे. हा घातक पायंडा महाराष्ट्रातल्या काही नालायकांनी घालून दिला आहे. आणि याची फार मोठी किंमत या देशाच्या लोकशाहीला चुकवावी लागणार आहे. त्याचबरोबर अशा पद्धतीने सरकार बनवण्याच्या प्रकारांमुळे देशाचे संविधान धोक्यात आलेले आहे. ते वाचवण्यासाठी विरोधी पक्षाने आपापले युगो बाजूला ठेवून एकत्र येण्याची आवश्यकता आहे. पण आता निवडणुकीला फार कमी अवधी राहिलेले आहे. अशा स्थितीत इंडिया आघाडीच्या चिरफाल्या उडायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा या देशात हुकूमशहांची पाळेमुळे घट्ट रुजणार आहेत. अशा स्थितीत देशाचे भवितव्य काय असेल हे वेगळे सांगायची आवश्यकता नाही.

# शिवजयंतीचे उत्साहात आणि मोठ्या प्रमाणात आयोजन



मुंबई/प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांनी स्थापन केलेले स्वराज्य हा भारताच्या इतिहासातील एक देदिप्यमान अध्याय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय ध्येयधोरणे आजही आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक आहेत. त्यामुळे त्यांच्या जयंती दिनी त्यांच्याप्रति कृतज्ञता अर्पण करणे, हे सर्वांचे कर्तव्य आहे. राज्यातील सर्वांनी शिवजयंती अतिशय उत्साहाने आणि मोठ्या प्रमाणात साजरी करावी, असे आवाहन वन, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे. यासंदर्भात, मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सर्व जिल्हाधिकारी यांना पत्र पाठवले असून प्रत्येक जिल्ह्यात शिवजयंती उत्सव विविध कार्यक्रमांनी, सर्वांचा सहभाग घेत साजरी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शिवजयंती ज्या ठिकाणी साजरी होईल, त्या ठिकाणचा परिसर स्वच्छ सुंदर व आकर्षक ठेवावा. कार्यक्रमाच्या ठिकाणी रंग-रंगोटी करुन रोषणाई करणे, रांगोळी काढणे आदी व्यवस्था करण्याबाबत कळविले आहे.

शिवजयंती उत्सवाच्या आरंभी राज्यगीत वाजविण्यात यावे व त्यासाठी पोलीस बँडची व्यवस्था करावी. कार्यक्रमाच्या आधी व कार्यक्रमादरम्यान शिववंदना, स्थानिक कलावंतांकडून पोवाडा गायन, छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भातील गीत-गायन इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत. शिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, शौर्यगीत स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. यासंदर्भात स्थानिक जिल्हास्तरावर व्यापक प्रसिध्दी करावी. जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांचा यामध्ये सहभाग असावा, अशा सूचना श्री. मुनगंटीवार यांनी सर्व जिल्हाधिकारी यांना दिल्या आहेत. कार्यक्रमाच्या अनुषंगाने स्थानिक स्तरावर प्रसिद्धीसाठी टीजर, शॉर्ट क्लिप, ग्राफिक्स, विविध मान्यवर यांच्या आवाहनाचे छोटे व्हिडिओ अशा पद्धतीने समाज माध्यमांचा उचित उपयोग करावा. कार्यक्रमाच्या प्रसिद्धीसाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करावे, अशा सूचनाही मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी केल्या आहेत. राज्य शासनामार्फत दरवर्षी दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती शासकीय कार्यालयात साजरी करण्यात येते. दि. १९ फेब्रुवारीचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज यांचे ज्या ठिकाणी पुतळे/स्मारके आहेत, तेथे जयंती साजरी करण्यात यावी, असे निर्देशही राज्य शासनाने दिले आहेत. त्याचीही अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

### सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून वर्षभरात विविध उपक्रम

दरम्यान शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त राज्यात सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून सांस्कृतिक कार्य विभाग आणि इतर विभागांच्या साह्याने विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये बऱ्याच वर्षापासून प्रतापगड किल्ल्याच्या पायथ्याशी झालेले अतिक्रमण वन विभागामार्फत हटविण्यात आले. दि. १९ फेब्रुवारी २०२३ रोजी आग्रा येथील दिवाण ए खास या महालामध्ये शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. त्या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार उपस्थित होते. राज्याभिषेकाच्या एक महिना आधी छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगड येथील भवानी मातेच्या मंदिरामध्ये भवानी मातेसाठी छत्र अर्पण केले होते. त्या घटनेचे औचित्य साधून श्री. मुनगंटीवार यांनी यावर्षी दिनांक २१ मे २०२३ रोजी प्रतापगड येथील भवानी माता मंदिरास चांदीचे छत्र अर्पण केले. सन २०२३ च्या रायगड येथील शिवराज्याभिषेकाच्या सोहळ्यासाठी देशभरातील विविध ठिकाणचे पवित्र जल एकत्र करून सहस्त्रजलकलश यात्रा २६ मे २०२३ रोजी राजभवन येथून सुरू करण्यात आली व या जलाद्वारे रायगड येथे दि. २ जून २०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळ्याच्या वेळी जलाभिषेक करण्यात आला. रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात येतो. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांची मिरवणूक चांदीच्या पालखीतून काढण्यात येते. या मिरवणूक सोहळ्यासाठी चांदीची पालखी मंत्री श्री. मुनगंटीवार यांचेमार्फत रायगड उत्सव समितीस भेट देण्यात आली. दिनांक १ जून २०२३ रोजी गेट वे ऑफ इंडिया, मुंबई येथे राज्य शासनाच्या पुरातत्त्व विभागामार्फत शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले. ३५० व्या शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागामार्फत विशेष लोगोचे प्रसारण करण्यात आले. किल्ले रायगड येथे दि. २ जून २०२३ रोजी तिथीप्रमाणेही शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला. दि. ६ जून २०२३ रोजी शिवराज्याभिषेक वर्षाच्या निमित्ताने शिवकालीन होन या विशेष टपाल तिकिटाचे राजभवन, मुंबई येथे अनावरण करण्यात आले. मंत्रालयात सार्वजनिक उद्घोषणा प्रणालीद्वारे दररोज सकाळी शिवविचार प्रसारणास दि. १८ ऑगस्ट २०२३ पासून सुरुवात झाली. तेव्हापासून मंत्रालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दररोज सकाळी १० वाजून ४५ मिनिटांनी एक शिवविचार ऐकवण्यात येतो. छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील श्री शहाजीराजे यांच्यावरील विशेष टपाल तिकिटाचे अनावरण दि. १८ ऑगस्ट २०२३ रोजी मंत्रालयात करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाच्या वधासाठी वापरलेली वाघनखे सध्या लंडन येथील व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियम मध्ये आहेत. ती वाघनखे भारतात आणण्याच्या सामंजस्य करारावर दि. ३ ऑक्टोबर २०२३ रोजी स्वाक्षरी करण्यात आली. जम्मू-काश्मीर मधील कुपवाडा येथे भारतीय आर्मीच्या बेसवर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा दि. ७ नोव्हेंबर २०२३ रोजी बसविण्यात आला. दि. १२ जानेवारी २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री मॉसाहेब जिजाऊ यांच्या जयंती दिनानिमित्त त्यांचे जन्मस्थळ सिंदखेडराजा, जिल्हा बुलढाणा येथे विशेष टपाल तिकिटाचे अनावरण करण्यात आले. सांस्कृतिक कार्य विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित महानाट्याचे प्रयोग प्रत्येक जिल्ह्यात करण्यात येत आहेत. याचा आरंभ १३ जानेवारी २०२४ रोजी नागपूर येथे करण्यात आला. मराठा साम्राज्याचे चलन या विषयासंदर्भात जनजागृतीसाठी एकदिवसीय शिबिर महाराष्ट्र राज्यात बारा ठिकाणी घेण्यात येणार आहे. तसेच या विषयासंदर्भात मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांमध्ये कॉफीटेबल बुक तयार करण्यात येणार आहे. राज्याचे वित्त व नियोजन मंत्री असताना श्री. मुनगंटीवार यांनी पुढाकार घेऊन श्री शिवाजी मेमोरियल कमिटी, श्रीशैल्यम, आंध्र प्रदेश यांच्या मागणीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांचे श्रीशैल्यम येथे ध्यानमंदिर बांधण्यासाठी रुपये ३ कोटी ३८ लाख आर्थिक मदत महाराष्ट्र शासनामार्फत करण्यात आली होती.

# प्रवाशांच्या सेवेसाठी या ब्रीदवाक्यानुसार प्रवाशांना उत्तम दर्जाची सेवा द्यावी - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात ५ हजार १५० इलेक्ट्रिक बस दाखल



ठाणे/प्रतिनिधी

खाजगी बस सेवेशी स्पर्धा करताना प्रवासी हाच आपला परमेश्वर असे मानून आणि प्रवाशांच्या सेवेसाठी या ब्रीदवाक्यानुसार प्रवाशांना उत्तम दर्जाची सेवा द्यावी, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात ५ हजार १५० इलेक्ट्रिक बसेस दाखल झाल्या. या बसेसचा लोकार्पण सोहळा येथील खोपट बस स्थानक या ठिकाणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रविंद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे सचिव पराग जैन, व्यवस्थापकीय संचालक माधव पुसेकर, गोपाल लांडगे, मिनाक्षी शिंदे आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला ५ हजार १५० इलेक्ट्रिक बस आपण देत आहोत. काळ बदलतोय, स्पर्धात्मक जगात पुढे जातोय, अशा परिस्थितीत पर्यावरण रक्षणाचा विचार करता इलेक्ट्रिक वाहनांची गरज निर्माण झाली आहे. एसटी ही महाराष्ट्राची लाईफ लाईन आहे. गाव तिथे रस्ता, गाव तिथे एसटी या ब्रीदवाक्यावर अनेक ठिकाणी एसटी ची बस सेवा खेडोपाडी पोहोचते. अनेक वर्षापासून एसटी चालक-वाहक आणि गावकरी यांचे ऋणानुबंध जुळले आहेत. एसटी आपल्या परिवारातीलच एक घटक आहे. एसटीचे ग्रामीण भागाच्या विकासात मोठे योगदान आहे. अविश्रांत काम करणारा एसटी कर्मचारी आपल्या सर्वांच्या जवळचा आहे. इलेक्ट्रिक बस, सीएनजी/एलएनजी गाड्यांमुळे प्रदूषण होणार नाही. पर्यावरण पूरक वातावरण कायम राहील. पर्यावरणाचा समतोल राखला जाईल. सध्या बोरिवली-ठाणे-नाशिक मार्गावर ही इलेक्ट्रिक बस सेवा सुरू होत आहे. मुख्यमंत्री श्री.शिंदे पुढे म्हणाले, इलेक्ट्रिक वाहन खरेदीसाठी महानगरपालिकांना निधी देण्याचे केंद्र सरकारचे धोरण आहे. ग्रामीण भागातील लोकांनाही वातानुकूलित सेवा मिळणे आवश्यक आहे. सर्वसामान्यांनाही चांगल्या सोयीसुविधा मिळायला हव्यात, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. एस.टी. प्रवासासाठी महिलांना ५० टक्के सवलतीत तिकीट योजना, ६५ ते ७५ वयातील नागरिकांना ५० टक्के सवलत तर ७५ वर्ष व त्यावरील वय असलेल्या नागरिकांना मोफत प्रवास योजना या योजना महाराष्ट्र राज्यात यशस्वी झाल्या आहेत.

एसटी नफ्यात येण्यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी एकत्रित प्रयत्न करायला हवेत. एसटी आपली आहे असे मानून तिचा सांभाळ करायला हवा, असे आवाहन करुन मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी चांगली सेवा देणाऱ्या एस.टी. कर्मचाऱ्यांना वेतनिक लाभ देण्यात यावेत, असे निर्देश दिले. ते म्हणाले की, एस.टी आगार स्वच्छ असले पाहिजे, तिथे आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा असाव्यात. शासनाकडून औद्योगिक विकास महामंडळाला एसटी सुशोभिकरणासाठी सहाशे कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. यातून एस.टी. आगारातील रस्ते चांगले व्हावेत, रंगकाम व्हावे, इतर सोयीसुविधा निर्माण केल्या जाव्यात, ही अपेक्षा आहे. नवनवीन कल्पना अंमलात आणून एस.टी अधिक लोकप्रिय होण्यासाठी सर्वांनी झटून काम करावे. डीप क्लीन ड्राईव्ह च्या माध्यमातून सर्वत्र उत्तम प्रकारे स्वच्छता होत आहे. शहरी व ग्रामीण भाग कचरामुक्त होण्यासाठी शासन स्तरावरुन सर्व प्रकारचे प्रयत्न होत आहेत. एस.टी आगारांतर्गत स्वच्छता स्पर्धा आयोजित कराव्यात. तेथील स्वच्छतागृह उत्तम दर्जाचे असावेत. एस.टी.चालक-वाहक यांची विश्रांतीगृहे चांगली असावीत. एस.टी. कॅन्टीन चांगले असावे. तिथल्या अन्नाचा दर्जा उत्तम असावा. गाड्या स्वच्छ असाव्यात. नागरिकांना चांगली सेवा मिळायला हवी. गेल्या आठ महिन्यांपासून आपण हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियानांतर्गत राज्यातील १९३ बस स्थानकांचे सौंदर्यीकरण व सुशोभीकरण योजना जाहीर केली आहे. मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, राज्यात १७३ पेक्षा जास्त बसस्थानकांवर ई-चार्जिंगची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. हात दाखवा एसटी थांबवा या उपक्रमामुळे लोकांमध्ये आणि एस.टीमध्ये भावनिक नाते तयार झाले आहे. एस.टी कर्मचारी गावातील गरजूंना सेवा देतात.

एस.टी महामंडळाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रश्न नक्कीच मार्गी लावू. अनेक तीर्थक्षेत्रासाठी आपल्या एसटीच्या सेवा दिल्या जातात. राज्यातील सर्वच गाड्या चांगल्या दर्जाच्या असाव्यात. नागरिकांना चांगली सेवा देवून आपल्या एस.टी. ला नफ्यात आणूया, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी शेवटी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव पराग जैन यांनी केले. कार्यक्रमानंतर मुख्यमंत्र्यांनी खोपट बसस्थानकाची पाहणीही केली व संबंधित अधिकाऱ्यांना बसस्थानकात अधिक सोयीसुविधा निर्माण करण्याविषयी आवश्यक त्या सूचना दिल्या.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# जिल्हा परिषद अध्यक्ष, पदाधिकारी यांनी बालकांना जंतनाशक गोळ्या भरवून केला मोहिमेचा शुभारंभ!



पालघर/प्रतिनिधी

राष्ट्रीय जंत नाशक मोहीम आजपासून सुरू होत असून जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी जिल्हा परिषद शाळा तेलीपाडा,मोखाडा, जिल्हा परिषद उपाध्यक्ष पंकज कोरे यांनी आपल्या गटात, महिला व बालकल्याण समिती सभापती रोहिणी शेलार, यांनी अंगणवाडी केंद्र परळी, ता.वाडा, येथे तर मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे आणि जिल्हा परिषद सदस्या वैशाली करबट यांनी जिल्हा परिषद शाळा माहीम येथे, तसेच सर्व जिल्हा परिषद सदस्य आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी आपापल्या गटात उपस्थित राहून बालकांना जंतनाशक गोळी भरवून या मोहिमेचा शुभारंभ केला. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी मुलांना हात स्वच्छ धुवावेत, नखे कपावित तसेच आई-वडिलांनी मुलांच्या स्वच्छते कडे लक्ष द्यावे, स्वच्छता राखली तर मुलांना जंत होणार नाहीत असे सांगून १ ते १९ वयोगटातील कोणतेही बालक या जंतनाशक औषधी पासुन वंचीत राहणार नाही याकरीता सर्व नागरिक, स्वयंसेवी संस्था यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी केले. जिल्हात १ ते १९ वर्ष वयोगटातील ६ लाख ३३ हजार ३२१ मुले असून या वयोगटातील मुलांना परजीवी जंतूपासून आजार उद्भवण्याचा धोका आहे. १ ते १९ वर्षे वयोगटातील किमान २८ टक्के बालकांमध्ये आढळणारा आतड्याचा कृमीदोष मातीतून प्रसारित होणारे जंतुपासून होतो. याचे प्रमुख कारण म्हणजे वैयक्तिक व परिसर स्वच्छतेचा अभाव आहे. परिणामी कुपोषण, रक्तक्षय, पोटदुखी, भूक मंदावणे, अतिसार, आतड्यांवर सूज येणे आदी समस्या निर्माण होतात. त्यामुळे बालकांची शारीरीक व बौद्धिक वाढ खुंटणे या समस्या निर्माण होतात. राष्ट्रीय जंत नाशक मोहीम राबवण्याचा उद्देश हा १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना शाळा, अंगणवाडी केंद्रस्तरावर जंत नाशक गोळी देऊन त्यांचे आरोग्य चांगले ठेवणे. पोषण स्थिती, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावणे हा आहे. जिल्ह्यात ६ लाख ३३ हजार ३२१ लाभार्थी असून यामध्ये १ ते ६ वर्षे वयोगटातील १,६९,९७७, ६ ते १० वर्षे वयोगटातील १,७२,००९ तर ११ ते १९ वयोगटातील २,९१,३३५ मुलांचा समावेश आहे.

# देशविघातक धोरणांच्या निषेधार्थ वाड्यात 'रास्ता रोको'

वाडा/प्रतिनिधी



कामगार, कर्मचारी, शेतकरी, शेतमजूर, मध्यमवर्ग, महिला, युवा, शिक्षक, वकील, डॉक्टर, पत्रकार नागरी समाज आणि जनतेच्या इतर सर्व घाटकांना या जनविरोधी राष्ट्रविरोधी हुकूमशाहीराजवटीचा प्रतिकार करण्यासाठी आणि तिला पराभूत करण्यासाठी अखिल भारतीय किसान सभा, भारतीय ट्रेड युनियन केंद्र, अखिल भारतीय जनवादी महिला संघटना, भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघ, स्टुडन्ट फेडरेशन ऑफइंडिया व आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच यांच्या संयुक्त विद्यमाने वाड्यातील खंडेश्वरी नाका येथे शुक्रवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी रास्ता रोको करण्यात आला. याप्रसंगी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. देशात व राज्यात बेरोजगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. शिक्षणाचा खर्च वाढल्याने व सरकारी शाळा बंद केल्या जात असल्याने, सामान्य व गरीब जनतेला शिक्षण घेणे अशक्य होऊ लागले आहे. सरकारच्या धोरणांमुळे बेरोजगार युवकांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. महिला सुरक्षा, आरोग्य, अन्न सुरक्षेचेही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. सरकारच्या विरोधात असलेला जनतेच्या मनातील हा असंतोष दुसरीकडे वळविण्यासाठी सत्ताधारी भाजप व आर. एस. एस. ने धर्म, जाती व अस्मितांच्या मुद्यांना कमालीची हवा दिली आहे. अयोध्येतील राम मंदिराच्या आधारे देशभर धर्मांधतेला अधिक टोकदार केले गेले आहे. राज्यातील गावोगाव यामुळे धार्मिक उन्मादाचे वातावरण निर्माण केले आहे. आरक्षणाचा मुद्दा केंद्रस्थानी आणून जातींमध्येही टोकाचे द्वेषमूलक संघर्ष वाढविले गेले आहेत. धनगर-आदिवासी व मराठा-ओ.बी.सी. असे अंतर्गत टोकाचे विषारी संघर्ष संधिसाधू अध:पतन, बेरोजगारी, महागाई, विषमता, शेती अरिष्ट, शिक्षण, शेतकरी, शेतमजूर व बेरोजगार युवकांच्या आत्महत्या, कामगार कर्मचाऱ्यांचे जीवन मरणाचे गंभीर होत असलेले प्रश्न, वाढून निर्माण झालेल्या असंतोषापासून विचलित करण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांनी केला आहे. सत्ताधाऱ्यांचा हा कावा उधळून लावण्यासाठी राज्यातील डावे, लोकशाहीवादी पक्ष, संघटना व व्यक्ती ताकदीने लढत आहेत. देशस्तरावर संयुक्त किसान मोर्चा (एसकेएम) आणि केंद्रीय ट्रेड युनियन्स (सीटीयु) ने यासाठी आरपारच्या संघर्षाची हाक दिली आहे. त्या अनुषंगाने खंडेश्वरी नाका येथे दोन तास महामार्ग रोखून धरला होता. दरम्यान वाडा शहरातून भव्य रॅली काढून सर्व दुकाने बंद करण्या बाबत आवाहन केले असता मुख्य बाजारपेठेतील दुकाने बंद ठेवण्यात आली होती. पोलीस निरीक्षक रणवीर बयेस यांनी अतिरिक्त कर्मचारी मागवून चोख बंदोबस्त ठेवल्याने आंदोलन यशस्वी रित्या पार पडले.

# विद्यार्थ्यांनी 'व्हॅलेंटाईन डे' अनोख्या पद्धतीने केला साजरा



वसई/प्रतिनिधी

'व्हॅलेंटाईन डे' आपल्या प्रिय व्यक्तीस भेटवस्तू देऊन साजरा करण्याचा तरुणाईचा कल असतो. परंतु अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाचे आजी व माजी रासेयो स्वयंसेवक मात्र सामाजिक भान राखत दरवर्षी आगळ्या वेगळ्या पद्धतीने हा दिवस साजरा करतात. प्रेम व आपुलकीची भावना वंचित व निराधार समाजघटकांपर्यंत पोहोचावी यासाठी रासेयो स्वयंसेवकांनी सालाबाद प्रमाणे यावर्षीसुद्धा वसई-विरार क्षेत्रातील निराधार मुले व ज्येष्ठ नागरिक यांना अन्नाच्या स्वरूपात भेट दिली. २०१७ रोजी किशन सहानी, आशिष काजरेकर या रासेयो स्वयंसेवकांनी हा अभिनव उपक्रम हाती घेतला. तेव्हा त्यांनी ५० बिस्किटांचे पुडे व पाण्याच्या बाटल्या यांचे वाटप केले. तेव्हापासून आजतागायत हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला असून त्याची व्याप्ती दरवर्षी वाढत आहे. यंदा ५५० शाकाहारी बिर्याणीच्या पार्सल पाकिटांचे व बिस्किटे, पाणी यांचे वाटप करण्यात आले. अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाचे शिक्षक, आजी व माजी विद्यार्थी तसेच सामाजिक जाणीवने प्रेरित झालेले अनेक नागरिक या उपक्रमासाठी आर्थिक योगदान देतात. रासेयो स्वयंसेवक काही कष्टकरी महिलांच्या सहकार्याने बिर्याणी बनवितात, पॅकिंग करतात आणि रस्त्यावर, रेल्वे स्थानकांवर आश्रय घेणाऱ्या निराधार व्यक्तींना अन्न वाटप करतात. भौतिक सुखात व स्वकेंद्रित विश्वात भरकटणाऱ्या तरुणाईपुढे आमचे छडड चे विद्यार्थी नक्कीच चांगला आदर्श ठेवतील व प्रेमाचा व्यापक संदेश समाजापर्यंत पोहोचवतील असा विश्वास रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शत्रुघ्न फड व प्रा. आदिती यादव यांनी व्यक्त केला. रासेयो स्वयंसेवकांना या अभिनव उपक्रमासाठी वर्तक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे यांनी शुभेच्छा दिल्या.

# अंधेरी गुदवली येथील निर्माणाधीन इमारतीचे काम केंव्हा पूर्ण होणार!



मुंबई/प्रतिनिधी

अंधेरी पश्चिम दूतगती मार्ग जवळ गुंदवली परिसरातील, महाकाली इमारत क्रमांक १,२,३,४ समोर इमारतीचे जोरदार काम सुरु आहे. मोठी मोठी यंत्रे व त्यांचा आवाजाने, ह्या परिसरात आवाजच प्रदूषण होत आहे. लहान बालके, आजारी रुग्ण व वयस्क रहिवाश्यांना भरपूर त्रास ही होत आहे. तसेच माती व धूळ सतत उडत असल्याने, या ठिकाणी, खोकला व सर्दीचा त्रास देखील लोकांना होत आहे. याची दखल महानगर पालिका, आमदार, खासदार, नगरसेवक सामाजिक स्वस्थांनी घ्यावी. तसेच खड्ड्यात साच्यारा पाण्याने डासांचा भरपूर प्रादुर्भाव होत आहे. अनेक लोक हा डासांचा रोगांनी आजारी आहेत. यांची नोंद वरील माननीय, आरोग्य खात्याने व मंत्र्यांनी घ्यावी.

# आर्थिक स्वातंत्र्य या विषयावर वर्तक महाविद्यालयात कार्यशाळा



वसई/प्रतिनिधी

आजच्या काळात चांगल्या कमाईबरोबरच कष्टपूर्वक कमावलेल्या पैशांची गुंतवणूक करण्यासाठी योग्य पर्याय शोधणे हेही अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीने अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागातर्फे आर्थिक स्वातंत्र्य आणि योग्य गुंतवणूक या विषयावर महाविद्यालयात एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली. गुंतवणूक तज्ज्ञ आणि गुंतवणूक सल्लागार ऐश्वर्या मोहोळ यांनी उपस्थितांना बचत आणि गुंतवणूक यातील फरक स्पष्ट केला तसेच करामध्ये बचत करणाऱ्या, सुरक्षित आणि चांगला परतावा देणाऱ्या अनेक गुंतवणूक पर्यायांबद्दल माहिती दिली. व त्यांचे शंका समाधान केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे यांनी या कार्यशाळेचे उद्घाटन केले. त्यांनी भारतीयांच्या बचतीच्या सवयींचा उल्लेख करून त्याचे गुंतवणूकीत रूपांतर होण्याची आवश्यकता विशद केली. अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख आणि महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. जानकी सावगाव यांनी या कार्यक्रमाचे उद्देशकथन आणि प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी आर्थिक व्यवस्थापनाचे महत्त्व सागितले आणि केवळ पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन प्रत्यक्ष व्यवहारातील ज्ञान महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले. व्यावसायिक अर्थशास्त्र विभागाचे प्रा. विनायक निकस यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. गायत्री राजपूत यांनी पाहुण्यांचे स्वागत केले तर प्रा. श्वेता विचारे यांनी आभारप्रदर्शन केले. महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ. हिरानंद खंबायत, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. भीमराव होनपारखे हे यावेळी उपस्थित होते.

## वाळू, रेती पुरविण्यासाठी सर्वंकष सुधारित रेती धोरण

# 'ना नफा' 'ना तोटा' तत्त्वावर वाळू विक्री दर निश्चित करणार

मुंबई/प्रतिनिधी



अनधिकृत उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्याच्या उद्देशाने शासनामार्फत ऑनलाईन पद्धतीने ग्राहकांना वाळू व रेती पुरविण्याबाबत सर्वंकष सुधारित रेती धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. ना नफा ना तोटा तत्त्वावर वाळू विक्री दर निश्चित करण्यात येणार आहे. वाळू गटातून वाळूचे उत्खनन, उत्खननानंतर वाळूची डेपोपर्यंत वाहतूक, डेपो निर्मिती व व्यवस्थापन यासाठी एक निविदा प्रक्रीया राबविण्यात येईल. नदी/खाडीपात्रातून वाळूचे उत्खनन, वाळूची डेपोपर्यंत वाहतूक, डेपो निर्मिती व व्यवस्थापन या करिता संबंधीत जिल्हातील डेपोनिहाय प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या निविदेमध्ये प्राप्त होणारा निविदेतील अंतिम दर असेल. स्वामित्वधनाची रक्कम : मुंबई महानगर प्रदेशासाठी १२०० रुपये प्रति ब्रास (रुपये २६७/- प्रति मेट्रिक टन) व मुंबई महानगर प्रदेश वगळून इतर क्षेत्राकरिता ६०० रुपये प्रति ब्रास (रुपये १३३/- प्रति टन) इतकी स्वामित्वधनाची रक्कम अनुज्ञेय राहील. यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा जशासतश्या लागू करण्यात येतील. जिल्हा खनिज प्रतिष्ठाण निधी, वाहतूक परवाना सेवा शुल्क व नियमानुसार शुल्क आकारण्यात येईल. शासकीय योजनेतील पात्र घरकूल लाभार्थ्यांना ५ ब्रास (२२.५० मेट्रिक टन) पर्यंत विनामूल्य वाळू देण्यात येईल. वाळू डेपोतून वाळू वाहतूकीचा खर्च ग्राहकांना करावा लागेल. वाळूचे उत्खनन, उत्खननानंतर वाळूची डेपो पर्यंत वाहतूक, डेपोची निर्मिती आणि व्यवस्थापन यासाठी एक निविदा प्रक्रीया राबवण्यात येईल. यातून वाळू किंवा रेती उत्खनन करण्यात येईल. ही रेती शासनाच्या डेपोमध्ये नेली जाईल व तिथून या रेतीची ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री करण्यात येईल. नदी/खाडी पात्रातील वाळू गटाचे निरीक्षण करण्याची कार्यवाही तहसिलदारांच्या अध्यक्षतेखालील तांत्रिक समिती करेल. जिल्हातील प्रत्येक तालुक्यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय वाळू संनियत्रण समिती स्थापन करण्यात येईल. ही समिती वाळू गट निश्चित करून, त्या गटासाठी ऑनलाईन ई-निविदा पद्धती जाहीर करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीला शिफारस करेल. जिल्हास्तरीय संनियत्रण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतील आणि या समितीत मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्त, अपर जिल्हाधिकारी, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभाग तसेच प्रादेशिक परिवहन अधिकरि, भू-विज्ञान व खनिकर्म विभाग, भूजल सर्वेक्षण तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी असतील. ही समिती वाळू डेपोमध्ये वाळू साठा उपलब्ध करून घेण्यासाठी वाळू गट निश्चित करतील. तसेच राष्ट्रीय हरित न्यायधिकरणाच्या निर्देशांचे पालन होईल, याची दक्षता घेईल.

# कर्ज वसुली करणाऱ्या एजंटच्या त्रासामुळे स्वत:च्याच अपहरणाचा रचला डाव!

नालासोपारा/प्रतिनिधी



नालासोपारा येथील एका तरुणाने कर्ज वसुली करणाऱ्या एजंटच्या त्रासमुळे स्वत:च्या अपहरणाचा डाव रचल्याचे उघडीस आले आहे. गुन्हे शाखा २ च्या पथकाने या प्रकरणाचा उलगडा केला आहे. नालासोपारा पूर्वेच्या अलकापुरी येथे राहणाऱ्या अनुप विश्वकर्मा (२८) या तरुणाने सोमवारी अपहरण करण्यात आले होते. अपहरणकर्त्यांनी अनुपच्या कुटुंबियांकडून १ लाखांची मागणी केली होती. या प्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींच्या विरोधात खंडणी आणि अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. हे प्रकरण गंभीर असल्याने गुन्हे शाखा २च्या पथकाने या प्रकरणाचा तपास सुरू केला. पोलिसांच्या पथकाने तांत्रिक तपास करून अनुपच्या मोबाईलचा ठावठिकाणा (लोकेशन) काढले. ते दादर रेल्वे स्थानक परिसरात दाखविण्यात येत होते. त्यामुळे पोलिसांच्या पथकाने दादर रेल्वे स्थानक परिसर पिंजून काढला असता तेथून अनुपला ताब्यात घेतले. त्याचे कुणी अपहरण केले? कुठे ठेवले होते? याबाबत त्याला समाधानकारक उत्तरं देता आली नाहीत. त्यामुळे पोलिसांना संशय आला. अधिक चौकशीत त्याने स्वत:च्या अपहरणाचा बनाव रचल्याची कबुली दिली. अनुप याने दोन वर्षांपूर्वी एका खासगी वित्तीय संस्थेकडून ९४ हजारांचे कर्ज घेतले होते. त्याचे हप्ते थकल्याने वसुली एजंट त्याच्या मागे लागले होते. वसुली एजंटकडून त्याला वारंवार धमक्या मिळत होत्या. त्यामुळे त्याने स्वत:च्या अपहरणाचा बनाव रचला होता असे गुन्हे शाखा २चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक शाहूराज रणावरे यांनी सांगितले. पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा २ चे प्रमुख शाहूराज रणावरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास कांबळे,सागर प्रकाश शिंदे आदींच्या पथकाने हे प्रकरण उघडकीस आणले. दोन महिन्यांपूर्वी असाच एक प्रकार वसईत उघडकीस आला होता. वसईच्या फादरवाडी येथे राहणार्या अंकीत यादव (२०) या तरुणाने देखील स्वत:च्या अपहरणाचा बनाव रचला होता. ७ डिसेंबर २०२३ रोजी तो घरातून बेपत्ता झाला होता. त्यानंतर वडील नन्हेलाल यादव यांना फोन करून तीन अनोळखी इसमांनी अपहरण केल्याचे सांगितले. अपहरणकर्त्यांनी अज्ञातस्थळी ठेवले असून खूप मारहाण करत असल्याचे सांगितले होते.

अपहरणकर्त्यांनी अंकितच्या व्हॉट्सअॅपवरून त्याच्या वडिलांना एक क्यूआर कोड पाठवला होता. त्यावर ३० हजार रुपये पाठविण्यास सांगितले होते. ते न पाठविल्यास मुलाला ठार मारण्याची धमकी देण्यात आली होती. वालीव पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने तपास केल्यानंतर अंकितने स्वत:च्या अपहरणाचा बनाव रचल्याचे उघडकीस आले होते. अंकितच्या दुचाकीच्या दुरुस्तीसाठी ३० हजारांचा खर्च होता. परंतु त्याचे वडील त्याला पैसे देत नव्हते. त्यामुळे त्याने स्वत:च्या अपहरणाचा बनाव रचला होता.

# जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या २८५ शिक्षकांची मुख्याध्यापक पदी पदोन्नती

पालघर : दिनांक १/१/२०२१ च्या शिक्षक संवर्गाच्या अंतिम सेवा जेष्ठता यादीतील प्रशिक्षित सेवा जेष्ठ प्राथमिक शिक्षक व पदवीधर शिक्षकांमधील २८५ कर्मचारी मुख्याध्यापक पदोन्नती साठी तात्पुरते स्वरूपात पात्र झाले आहेत, अशी माहिती शिक्षण विभाग प्राथमिक मार्फत देण्यात आली असून सदर शिक्षकांचे समुपदेशन दिनांक १६.२. २०२४ रोजी होणार आहे. अध्यक्षपदी बसल्यानंतर उपाध्यक्ष तथा शिक्षण समिती सभापती पंकज कोरे, सर्व समिती सभापती, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहकार्याने सातत्याने पाठपुरावा करून तसेच शिक्षण विभाग, सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग यांच्या अथक प्रयत्नांनी ही पदोन्नती होणे शक्य झालं आहे असे सांगून, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी शरदचंद्र माळी,शिक्षणाधिकारी संगीता भागवत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे यांचे मनापासून आभार व्यक्त केले. तसेच मुख्याध्यापक पदोन्नती मिळाली असून आता मुलांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष द्यावे,शैक्षणिक गुणवत्ते कडे दुर्लक्ष करू नये असे आवाहन अध्यक्षांनी केले आहे.

# जिल्हा परिषद पालघर येथे संत सेवालाल जयंती साजरी



पालघर/प्रतिनिधी

१५ फेब्रुवारी २०२४ रोजी जिल्हा परिषद पालघर येथे क्रांतिकारी युगपुरुष संत सेवालाल यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. बंजारा समाजातील समाज सुधारक संत सेवालाल यांनी समाजाला क्रांतिकारी विचारांचे दिलेले बोल वास्तववादी विचार करण्यास भाग पाडतात. संत सेवालाल यांनी दिलेल्या सेवाभावाची शिकवण बंजारा समाजाने आपल्या कंठात गीतांच्या रूपाने जपून ठेवली. गोरबंजारा जमातीमध्ये संत सेवालाल महाराज हे मोठे संत होऊन गेले. त्या काळी समाजाला भजनाची आवड होती. हे ओळखून त्यांनी बंजारा बोलीभाषेत लडी, भजन रचना करून समाजात धार्मिक व सांस्कृतिक बदल घडवून आणले. संत सेवालाल हे त्यागी, दूरदर्शिता, बुद्धिप्रामाण्य विचारांचे महान संत व थोर समाजसुधारक होते. अशा थोर महापुरुषाची जयंती आज साजरी करतात आली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी शरदचंद्र माळी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रवीण भावसार तसेच सर्व अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयात हजार कर्मचारी वाढणार!

वसई : गेल्या वर्षी राबविण्यात आलेल्या भरती प्रक्रियेत निवड झालेले पोलिस आता प्रत्यक्ष सेवेत रुजू होणार आहेत. प्रशिक्षण पूर्ण झाल्यामुळे आठवडाभरात ९९६ हे कर्मचारी सेवेत दाखल होणार आहेत. गेल्या वर्षी जानेवारीमध्ये ९९६ पदांसाठी भरती प्रक्रियेला सुरुवात झाली होती. त्यात ९८६ पोलिस शिपाई, तर १० वाहन चालकांचा समावेश होता. या परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांपैकी अंतिम ९९६ उमेदवारांची निवड करून त्यांना प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आले होते. हे प्रशिक्षण पूर्ण झाले असून या आठवड्यात ते कर्तव्यावर हजर होणार आहेत. सरकारमार्फत मिरा-भाईंदर, वसई-विरार शहरात दुसऱ्या टप्प्यातील पोलिस भरतीसाठीचा आदेश जाहीर झाल्यानंतर लवकरच आणखीन एक हजार पदांसाठी पोलिस भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. पोलिस भरतीसाठी प्राप्त झालेल्या ७१९५१ अर्जांमध्ये ५९८४७ पुरुष व १२१०४ महिला उमेदवारांचा समावेश होता. प्रत्यक्ष ४९४७९ उमेदवार भरती प्रक्रियेत सहभागी झाले. शारीरिक चाचणी व लेखी परीक्षा पार करत ९९६ जणांनी अंतिम निवडीत स्थान प्राप्त केले.

# वेश्याव्यवसाय अड्ड्यावर एमआयडीसी पोलिसांचा छापा

लातूर/अंबादास करकरे

शहरातील एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या राम रहीम नगर मध्ये राजरोसपणे चालत असलेल्या कुंटण खाण्यावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष व एमआयडीसी पोलीस पथकाने संयुक्त कारवाई करत ३ आरोपींना गजाआड केली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात पिटा अक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, खाळगाव रोड लगत असलेल्या राम रहीम नगर भागातील एका घरामध्ये समाजातील असाह्य महिलेचा फायदा घेत त्यांना पैशाची आमिष दाखवून देह विक्रीस प्रावर्त करत असल्याची गुप्त माहिती अनैतिक मानवी देह व्यापार प्रतिबंध कक्ष व एमआयडीसी पोलीस ठाण्याला मिळाली होती. मिळालेल्या माहिती आधारे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नरवाडे यांनी पोलिसांचे एक पथक तयार करून त्यांना योग्य त्या सूचना करून संबंधित ठिकाणी कारवाई करण्याचे आदेश दिले. त्या अनुषंगाने एमआयडीसी पोलीस ठाणे पथकाने व अनैतिक मानवी देह व्यापार प्रतिबंधक कक्ष पथकाने खाडगाव रोड लगत असलेल्या एका मंगल कार्यालयाच्या पाठीमागे असलेल्या राम रहीम नगर भागात सापळा लावला. दरम्यान साडेपाच वाजण्याचा सुमारास संशयित घरावर छापा मारला असता एका महिलेसह दोन पुरुष आढळून आले. त्यांची नावे विचारले असता त्यांनी पूजा पंढरी वल्लुरे, ज्ञानेश्वर पंढरी वल्लुरे व सचिन अशोक उबाळे अशी सांगितली. त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी घरामधील एका रूम मध्ये इतर काही महिला असल्याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी अधिक झाडझडती घेऊन चौकशी केली असता पूजा पंढरी वल्लुरे, ज्ञानेश्वर वल्लुरे, व सचिन उबाळे हे सर्वजण संगमत करून कुंटणखाना चालवीत असल्याची माहिती समोर आली.

यातील नमुद आरोपीतानी संगनमत करून स्वतःचे आधिक फायदयासाठी बाहेरून महिलांना घरी बोलावुन घेवुन त्यांना पैशाचे अमीष दाखवुन परिसरातील व शहरातील पुरुष ग्राहक यांना घरी बोलावुन त्यांचेकडुन वेश्या व्यवसाय करवुन त्यातुन मिळणारे पैशावर स्वतःची उपजिपीका भागवित असल्याचे जबाब दिला . सरकारी फिर्यादी सुभाष शंकरराव सूर्यवंशी यांच्या फिर्यादी मजकुर जबाब वरुन एमआयडीसी पोलीस स्टेशन लातूर येथे गुरांन व कलम १२५/२०२४ कलम ३,४,५,७ अनैतिक व्यवसाय प्रतिबंध अधिनियम १९५६ सहकलम ३७०, ३४ भादवी प्रमाणे दाखल करण्यात आला असून सदरील सदर कार्यवाही ही पोनि दिवे, पोउपनि सुर्यवंशी, सीमा बेंद्रे, पोह. सदानंद योगी, प्रताप वांगे यांनी केली. पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नरवडे हे करीत आहेत.

# खानिवली ग्रामपंचायतीला आयएसओ मानांकन प्रमाणपत्र प्रदान

वाडा/प्रतिनिधी



वाडा तालुक्यातील खानिवली ग्रामपंचायतीच्या माध्यमातून अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात असून अनेक अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करुन लोकांना सेवा सुविधा पुरविण्याचे काम केले जात आहे. ग्रामपंचायतीने स्वतःचे मोबाईल ऐप्लिकेशन तयार केले असून त्या माध्यमातून अनेक ऑनलाईन सेवा पुरविण्याचे काम केले जात आहे. यामध्ये ग्रामपंचायतचा कर (घरपट्टी) भरणा ऑनलाईन भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. माझी वसुंधरा सारखे राज्य शासनाचे अभियान यशस्वी पणे राबविण्याचे काम खानिवली ग्रामपंचायतीकडून करण्यात येत आहे. त्यातच ग्रामपंचायतीला खडज ९००१:२०१५ मानांकन मिळाले आहे.त्यामुळे ग्रामपंचायतीचा दर्जा उंचावला आहे.या बाबतीत प्रमाणपत्र प्रदान सोहळा आयोजित केला होता. सदर सोहळ्यास अस्मिता लहांगे सभापती पंचायत समिती वाडा तसेच गटविकास अधिकारी राजेंद्र खताळ, उपसरपंच सागर पाटील, सदस्य प्रेरणा पोटिंदा, सारिका पाटील, फिरदोस काझी, खानिवली मंडळ अधिकारी भोईर भाऊसाहेब, खानिवली तलाठी डोकफोडे तात्या, गावचे पोलिस पाटील नितिन पाटील, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष एकनाथ पाटील, राम पाटील तसेच गावातील अंगणवाडी सेविका, आशा वर्कर व तरुण युवक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# बोळींज येथील गटाराचे बांधकाम सदोष असल्याने काम थांबविले!

विरार/प्रतिनिधी

विरार बोळींज जवळील जुनी रहिवाशी वस्ती असलेल्या जे.पी. नगर कोफराड येथील पालिकेने सुरु केलेले नियोजित गटाराचे काम सदोष बांधकामामुळे थांबविण्यात आले आहे. पालिकेने सदर कामाची पाहणी करुन हा निर्णय घेतला. बोळींज कोफराड येथील जे.पी.नगर वस्ती नजिक नवीन गटार पालिका तयार करीत आहे. मात्र पावसाळ्यात या गटारातून वाहून जाणारे नैसर्गिक पाण्याची गटाराचे बांधकाम गरजेपेक्षा कमी जागेत करण्यात आले आहे. वाहून जाणाऱ्या नाल्याची रुंदी कमी झाल्याने नागरीकांनी त्यावर आक्षेप घेतला. त्यानंतर महापालिकेने प्रत्यक्ष पाहणी करुन या कामाला स्थगिती दिली आहे. जे.पी.नगर रहिवाशी भागातून सांडपाणी व पावसाचे वाढलेले पाणी वाहून नेणारा नैसर्गिक नाला आहे. या नाल्याचे काँक्रीटीकरण करुन गटार तयार करण्याचे काम सुरु करण्यात येत होते. मात्र या कामामुळे नाल्याची रुंदी कमी झाली आहे. सात ते आठ फूट असलेला नाला आता दीड ते दोन फुटांवर आला. आधीच पावसाळ्यात जे.पी.नगरमध्ये पाणी साचून परिसरातील इमारतींच्या तळमजल्यामधे पाणी शिरते. आधीच पाणी निचरा होण्यास अडचणी त्यातच नाल्याची रुंदी कमी केल्याने नागरीकांच्या तक्रारी होत्या.

# बाभळगाव येथील पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या १९व्या सत्राचे दीक्षांत संचलन उत्साहात

लातूर/प्रतिनिधी

बाभळगाव येथील पोलीस प्रशिक्षण केंद्राचा १९ वा दीक्षांत संचालन सोहळा उत्साहात पार पडला. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. व्ही. पाटील यांची यावेळी उपस्थिती होती. प्रशिक्षण काळात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना यावेळी चषक, सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य तथा अपर जिल्हा पोलीस अधीक्षक अजय देवरे, केंद्रीय राखीव पोलीस दलाचे सहायक आयुक्त वाघचौरे, प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकारी नवदीप अग्रवाल यावेळी उपस्थित होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश पाटील यांनी प्रारंभी परेड निरीक्षण केले. त्यानंतर सर्व प्रशिक्षणार्थींना पोलीस प्राचार्य अजय देवरे यांनी कर्तव्य आणि जबाबदारीबाबत शपथ दिली. प्रशिक्षण पूर्ण झालेल्या पोलीस जवानांना प्रत्यक्ष कर्तव्य बाजविताना आपल्या प्रशिक्षण कालावधीत आत्मसात कौशल्याचा शिकलेल्या कायद्यांचा उपयोग होतो. सध्या गुन्ह्यांचे स्वरूप बदलत असून त्याअनुषंगाने



नवीन कायदेही तयार होत आहेत. कोणत्याही गुन्ह्याचा तपास करताना त्यासंबंधी असलेल्या कायद्याचा अभ्यास असल्यास तपासात त्रुटी राहत नाहीत. त्यामुळे प्रशिक्षणार्थी पोलीस जवानांनी प्रत्यक्ष कर्तव्य बजावताना वेळोवेळी नवीन येणाऱ्या कायद्यांचा अभ्यास करावा, असे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. व्ही. पाटील यांनी सांगितले. दरम्यान बाभळगाव येथील पोलीस प्रशिक्षण केंद्र २००६ पासून कार्यान्वित करण्यात आले असून आतापर्यंत १८ सत्रांमध्ये ८ हजार ३४० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच १९ व्या सत्रात नवी मुंबई, मिरा भाईंदर, नागपूर आणि पिंपरी चिंचवड येथील ९०९ पोलीस जवानांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

या केंद्राच्या माध्यमातून आदर्श आणि संवेदनशील पोलीस घडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य अजय देवरे यांनी प्रशिक्षण केंद्राचा अहवाल सादर करताना सांगितले. यावेळी पोलीस प्रशिक्षण वर्गात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षणार्थींचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. गोळीबार, बाह्य वर्गामध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल साहेबराव बाळासाहेब गाढवे (नवी मुंबई), बाह्यवर्गात द्वितीय क्रमांकासाठी प्रकाश हेतराम उईके (नागपूर), आंतरवर्ग प्रथम योगेश बाळू कदम (मिरा भाईंदर), आंतरवर्ग द्वितीय भीमराव आप्पासाहेब घोरपडे (मिरा भाईंदर), कमांडो वर्ग प्रथम रमेश रामलाल मडावी (मिरा भाईंदर) यांचा चषक देवून सन्मान करण्यात आला. तसेच सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थी म्हणून साहेबराव बाळासाहेब गाढवे यांना गौरविण्यात आले. पोलीस प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थींनी यावेळी आदिवासी नृत्य, लेझीम नृत्य सादर केले. तसेच लातूर पोलीस दलाच्या जवानांनी कमांडो प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांना आपल्या सामर्थ्याचे दर्शन घडविले. प्रशिक्षणार्थी पोलीस जवानांनी परेड निष्क्रमण संचलन करीत प्रशिक्षण केंद्राचा निरोप घेतला. पोलीस प्रशिक्षण केंद्राचे उप प्राचार्य पोलीस निरीक्षक व्ही. बी. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पान १ वरून...

## एकाच बाईकवर होते तीन टपोरी...

आला नाही. भूक लागून गेली तरी सुहेब चा पत्ता नव्हता. पोटात कावळे ओरडायला लागले. आता येईल मग येईल असे करता करता तीन वाजयला आले.परंतु सुहेबचा काही आला नाही. याच दरम्यान स्थानिक रहिवाशांचा त्याला फोन आला. तुझा धाकटा भाऊ सुहेब उर्फ शोएब अन्सारी याला साकीनाका येथील पॅरामाऊंट रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे .तू तातडीने रुग्णालयात ये. हा निरोप ऐकताच तो घाबरून गेला आणि त्याने तातडीने रुग्णालय गाठले. यावेळी सदाम हुसेन ईमामुद्दीन अन्सारी याचा भाऊ सुहेब उर्फ शोएब अन्सारी याला रुग्णालयाततील डॉक्टरांनी तपासणी करून मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच साकीनाका पोलीस ठाण्याचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक योगेश शिंदे, पो.नि.संभाजी साबळे, पोउनि नांगरे, पोउनि कादे, पोउनि लोणकर, पोउनि ससाणे, गुन्हे प्रकटिकरण पथक व निगराणी पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळची पाहणी केली असता सदर तरुणांच्या अंगावरील मारहाणीच्या खुणा पाहून या तरुणाला मारहाण करून त्याचा खून करण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसत होते. पोलिसांनी मृतदेहाचा इन्केस्ट पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी राजावाडी रुग्णालयात पाठविला. या प्रकरणी साकीनाका पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुद्ध गु.र.क. १८५/२०२४ कलम ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. पोलीस उपायुक्त दत्ता नलावडे व सहायक पोलीस आयुक्त भारतकुमार सुर्यवंशी, यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक योगेश शिंदे यांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन तपासला सुरुवात केली. आरोपींला पळून जाण्याची संधी न देता तपास पथकाने घटनास्थळी धाव घेऊन प्रत्यक्षदर्शींकडून घटनेची माहिती घेतली. तसेच गुप्त बातमीद्वारामार्फत माहिती घेऊन या गुन्ह्यातील तीन संशयित आरोपींना अगदी सहा तासात शिवाजीनगर गोवंडी येथील खान कंपाऊंड डंपिंग या ठिकाणाहून अनस इकरार अहमद शेख (वय २१), गुल्फराज बिसमिल्ला खान (वय २५) व अफजल सगीर अहमद सय्यद (वय २४) हे तिघे ही राहणार मोहन चाळ, खैराणी रोड, साकीनाका मुबई खुनाच्या गुन्ह्यात या तिघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलीस ठाण्यात आणून त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची हकीकत सांगितली. सुहेब उर्फ शोएब सुहेबुद्दीन ईमामुददीन अन्सारी (वय २२) हा रविवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास दुपारचे जेवण आणण्यासाठी चालला होता. सुहेब उर्फ शोएब हा सोमाणी रोड, एम.जे. स्टुडिओ समोरून चालत जात असताना अनस शेख, गुल्फराज खान व अफजल सय्यद हे तिघेच एकाच मोटारसायकलवर बसून तिकडून जात होते. या तिघांच्या मोटरसायकलचा सुहेब उर्फ शोएब याला धक्का लागला. त्यावेळी सुहेब अन्सारी हा त्यांना ओरडला. क्युरे दिखाता नही क्या? अंध्ये हो क्या? दिनडहाडे धक्का मारके काह भाग राहे, असे म्हणतात आरोपींनी दुचाकी थांबवली. त्यानंतर दुचाकीवरील तिघे खाली उतरले व त्यांनी सुहेब अन्सारीसोबत वाद घालण्यास सुरूवात केली. या वादानंतर तिघांनी अन्सारीला हाताने बेदम मारहाण केली तसेच पेव्हरब्लॉकने अन्सारीला मारहाण केली. त्यात गंभीर जखमी झाल्यामुळे अन्सारी खाली कोसळला. त्यानंतर पादचाऱ्यांनी अन्सारीला साकीनाका येथील पॅरामाऊंट रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी तपासणी करून अन्सारीला मृत घोषित केले. याप्रकरणाची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी प्रत्यक्षदर्शींकडून घटनेची माहिती घेतली. प्रत्यक्षदर्शींनी सांगितलेल्या आरोपींच्या वर्णनावरून गोवंडी शिवाजीनगर गोवंडी येथून तिघांना ताब्यात घेण्यात आले. अनस शेख, गुल्फराज खान व अफजल सय्यद यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनीच अन्सारीला मारहाण केल्याचे उघड झाल्यानंतर पोलिसांनी हत्येच्या गुन्ह्यात तिघांनाही अटक केली. ही यशस्वी कामगीरी पोलीस, सह आयुक्त (का.व सु.) सत्यनारायण चौधरी, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, (बांद्रा) मुंबई परनजीत सिंह दहिया, पोलीस उपआयुक्त परिमंडळ -१० चे दत्ता नलावडे, सहायक पोलीस आयुक्त (साकीनाका विभाग) भारतकुमार सुर्यवंशी, यांच्या मार्गदर्शनाखाली साकीनाका पोलीस ठाण्याचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक योगेश शिंदे, पो.नि.संभाजी साबळे, पोउनि नांगरे, पोउनि कादे, पोउनि लोणकर, पोउनि ससाणे, गुन्हे प्रकटिकरण पथक व निगराणी पथकाने पार पाडली.

## पूर्ववैमन्यस्य जीवघेणे ठरले ...

मुलासह राहयला आहे. हल्ली उन्हाळ्याचे दिवस असल्याने लोकांच्या पिण्याच्या पाण्याची बोंब लहान मोठया शहरात चालू आहे. त्यातच नदीच्या पाण्याची पातळी ही खालवली असल्याने शेतकऱ्यांना ऊसाला पाणी पाजणे ही अवघड झाले आहे. करवीर तालुक्यातील बहुतेक गावात ऊसाचे नगदी पीक हे शेतकरी घेत असतात. ज्या त्या गावात अनेक पाणी पुरवठा संस्थांनी पाणी योजना राबवली असल्याने त्या संस्था या ऊसाच्या शेतीला रात्रीच्या वेळी पाणी सोडत असतात यासाठी त्या संस्थेमार्फत पाटकरी हा पाणक्या म्हणून काम करीत असतो. जंबा साठे हा शाहू हरिजन संस्थेत पाटकरी म्हरून काम करीत असल्याने रविवार दि.११ फेब्रवारी रोजी सकाळी ७.४० वाजता तो गावातील आंबेडकर चौकात शेतकऱ्यांना पाणी पुरवठयाचे वेळापत्रक सांगण्यासाठी आला. तो चौकात उभारून दवंडी दिल्याप्रमाणे आपल्या माईकवरून जमलेल्या शेतकऱ्यांना पाणी पुरवठयाचे वेळापत्रक सांगत असताना अचानक त्याच्या समोर गावातील हरिजन वस्तीतील रत्नदीप ऊर्फ रतन भास्कर हा तेथे आला. जंबा साठे हा पाणी पुरवठयाचे वेळापत्रक सांगत असताना रतन भास्कर हा त्याच्या जवळ गेला. तेथे पडलेल्या लाकडी दांडक्याने त्याने जंबा साठे याच्या डोक्यात मारहाण केली.लाकडी दांडक्याने मारहाण झाल्याने जंबा साठे हे जागेवरच ओरडत खाली पडले. अचानक झालेल्या मारहाणीत जंबा साठे यांच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्त स्त्राव सुरू झाला. कोणाला काही कळायाच्या आतच रत्न भास्कर याने आपल्याकडील लाकडी दांडक्याने जंबा साठे याच्या डोक्यात सुमारे ११ वेळा मारहाण केली. त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. तेथे जमलेल्या लोकांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला परंतु तो त्याच्या तावडीतून सुटून गेला. तो पळून जात असताना त्याने बाजुलाच लावलेली एकाची मोटार सायकल घेऊन तो पळून जाण्यात यशस्वी झाला. तो पळून जात असताना लोकांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला परंतु तो लोकांच्या हाताला हिसडा मारून पळून गेला. खरे तर रतन भास्कर हा गुन्हे गारी प्रवृतीचा होता. यापूर्वी ही त्याचेवर करवीर पोलीस ठाण्यात चोरी, बलात्कार अशा स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल होते. त्यामुळे कुडित्रे आणि परिसरात त्याची ओळख ही गुन्हेगार म्हणून परिचित होता. त्यामुळे लोक त्याला घाबरत ही होते. त्याने सकाळी सकाळी गावातीलच जंबा साठे यांच्यावर लाकडी दांडक्याने वार करून त्याचा खून करून तो पळून गेल्याने गावात या विषयी वेगळीच चर्चा चालू झाली होती. ही घटना मयत जंबा साठे याच्या घराच्या लोकांना समजातच त्यांनी घटनास्थळी धाव घेत आरडा ओरडा करायला सुरूवात केली. घटनास्थळावरून संशयीत रतन साठे हा पळून गेल्याने गावकऱ्यांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. त्यातच कुणी तरी या घटनेची माहिती करवीर पोलीसांना दिल्यावर पोलीस ही घटनास्थळी तातडीने दाखल झाले.त्यांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात पाठविण्याचा प्रयत्न करीत असताना मयत जंबा साठे याचे नातेवाईक जीवन महापुरे,शंभू महापुरे आणि त्याच्या नातेवाईकांनी पोलीसांना मृतदेह हलविण्यास विरोध केला. जोपर्यंत या घटनेतील संशयीत आरोपी रतन साठे याला ताब्यात घेत नाही तोपर्यंत मृतदेह हलवू देणार नाही अशी मागणी त्यांनी पोलीसाकडे केली. या घटनेने गावातील वातावरण गंभीर आणि चितेंचे बनत चालल्याचे बघून वरिष्ट पोलीस अधिकाऱ्यांनी कुडित्रे गावाला भेट देऊन मयताच्या नातेवाईकांना शांत करण्याचा प्रयत्न केला. त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न पोलीसांनी केला. परंतु नातेवाईक आपल्या मतावर ठाम असल्याने पोलीसांचे ही काही चालले नाही. त्यामुळे पोलीसांनी गावात चोख बंदोबस्त लावला. इकडे करवीर पोलीसांनी पळून गेलेल्या रतन भास्कर याचा या घटनेनंतर अवघ्या दोन तासात शोध घेऊन त्याला गावातूनच ताब्यात घेतले. त्यानंतर मयत जंबा साठे याच्या नातेवाईकांनी पोलिसांना मृतदेहाच्या शवविच्छेदनास परवानगी दिली. पोलीसांनी मृतदेह शवविच्छेदनसाठी कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात पाठवून दिला. कुडित्रे गावात या घटनेने गंभीर बनल्याने गावातील घटनास्थळी पोलीस उपाक्षिक जयश्री देसाई, करवीर पोलीस निरी.किशोर शिंदे यांनी भेट देवून परिस्थीची पाहणी केली. या घटनेतील संशयीत आरोपी रतन भास्कर याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत दारूच्या नशेत आपण मागील भांडणाचा राग मनात धरून जंबा साठे याच्यावर लाकडी दांडक्याने मारहाण केली असल्याचे सांगितले. मागील काही दिवसापूर्वी मयत जंबा साठे याने रतन भास्कर याला एका प्रकरणातून तंबी दिली होती याचा राग रतन भास्कर याला होता. या रागातूनच त्याने जंबा साठे याला लाकडी दांडक्याने मारहाण केली अशी कबुली त्याने पोलीसासमोर दिली. या घटनेची लेखी फिर्याद मयत जंबा साठे याच्या मुलग्याने करवीर पोलीसात दिल्याने त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी जंबा साठे (वय ६०) याच्या खून प्रकरणी रत्नदीप ऊर्फ रतन भास्कर (वय ३८) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला कोल्हापुर येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली लाकडी दांडका जप्त केला. या घटनेचा पुढील तपास करवीर पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत. खरे या घटनेतील संशयीत आरोपी हा सराईत गुन्हेगार असल्याने त्याच्या हातून त्याने हा णंवरूनच गुन्हा केल्याचे दिसत होते. परंतु पोलीस चौकशीत तो प्रथमता माझी मानसिक विकृती बिघडलेली आहे असे सांगून तो पोलीसांची दिशाभुल करीत होता. पोलीसांनी त्याला ताब्यात घेण्यापूर्वी त्याची आरोग्य तपासणी केली असता त्याची मानसिक स्थिती ही बिघडलेली नसल्याचे समोर आले. परंतु सराईत गुन्हेगार हे गुन्हा करताना माझी मानसिक स्थीती बरोबर नसल्याचे सांगत असतात त्यातीलच प्रकार रतन भास्कर याने केला होता. जाणून बजून त्याने सकाळी सकाळी जंबा साठे याच्यावर लाकडी दांडक्याने मारहाण करून त्याचा खून केल्याचे पोलीस तपासात उघड झाले. या घटनेचा पुढील तपास करवीर पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत.

## अंगावर खाजखुजली टाकत लुबाडले

पनवेल : बँकेतून पैसे काढून घरी निघालेल्या एका व्यक्तीच्या मानेवर खाजखुजली टाकून ५० हजारांची रोख रक्कम असलेली बॅग चोरल्याची घटना नवीन पनवेलमध्ये घडली आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. कर्जत तालुक्यातील दहिवली येथे राहणारे रवींद्र गायकवाड (५८) नवीन पनवेल येथील सिडको कॉलनीतील बँकेत पैसे काढण्यासाठी गेले होते. पन्नास हजारांची रक्कम आपल्याजवळच्या बॅगेत ठेवून बँकेच्या बाहेर आले. यावेळी एका चोरट्याने गायकवाड यांच्या अंगावर खाज निर्माण होण्यासारखी पावडर टाकली. त्यामुळे गायकवाड यांच्या मानेवर खाज येऊ लागल्यानंतर मदत करण्याचा बहाणा करून त्यांना पाणी आणून दिले. तसेच शर्ट काढण्यास सांगितले. त्यामुळे गायकवाड यांनी आपल्या हातातील पैशांची बॅग बाजूला ठेवली होती. त्यानंतर गायकवाड यांना मदत करण्यासाठी आलेल्या चोरट्याने पलायन केले. त्यामुळे गायकवाड यांनी खांदेश्वर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

पान ८ वरून....

## वसईतील दिव्यांगांचे पुनर्वसन करून...

सहभाग दाखवला. काहींनी अपंगांबरोबर संवाद केला आणि त्यांचे जीवन समजून घेतले. त्याच वेळेला अपंग सेवाचे कार्यकर्ते फिरत होते अणि गरजू अपंगांची नोंद करत होते. जवळजवळ ५७ गरजूंची नोंद झाली. त्यापैकी वीस गरजूंच्या वैद्यकीय, शैक्षणिक, वैयक्तिक गरजा लगेच पूर्ण केल्या. दुपारी जवळजवळ ४००चा समुदाय असूनसुद्धा स्वयंसेवकांच्या नियोजनामुळे तासाभरात जेवणाचा कार्यक्रम समुहाने उरकला! यावेळी स्वयंसेवकांनी जे अपंग चालू शकत नव्हते अशांच्या जागी जाऊन त्यांचे हात धुतले, जेवण वाढले आणि जेवणानंतर त्यांचे हातसुद्धा धुतले! फादर जो आल्मेडा यांच्या मार्गदर्शनाखाली भोजन समितीने भोजनाचा कार्यक्रम शिस्तीत पार पडला. त्यानंतर अपंगांचा करमणुकीचा कार्यक्रम झाला. त्यामध्ये दिव्यांगांनी स्वतः सादर केलेली गाणी, नृत्ये इत्यादी बहारदार कार्यक्रम झाला. सीओन डिसोजा यांच्या ऑर्केस्ट्राने कार्यक्रमाला रंगत आणली; इतकंच नव्हे तर नव्याने विवाहित झालेले दोन दिव्यांग संजय आणि एंजल यांची बहारदार वरात साजरी केली. सर्व दिव्यांगी आणि स्वयंसेवकदेखील मन मुराद नाचले. जोडपे स्टेजवर पोहोचल्यावर त्यांना अपंग सेवातर्फे शाल-श्रीफळाने सन्मानित केले. शेवटी राष्ट्रगीताने मेळाव्याचा समारोप झाला.

## शाश्वत शेतीसाठी शेतकऱ्यांनी...

लातूर हा देशातील सर्वात मोठा सोयाबीन उत्पादक जिल्हा असून तूर आणि हरभरा या कडधान्यांचे दर निश्र्चित करण्यासाठी लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा फार मोठा वाटा आहे. शेतीतील महिलांचा टक्का वाढविण्यासाठी सातबाऱ्यावर महिलांचे नावे येणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी नमूद केले. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी विविध क्षेत्रात प्रगतीचे टप्पे गाठले आहेत. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या चळवळीच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी प्रगती साधली आहे. यामध्ये आणखी खूप काम करण्यास वाव असल्याचे त्यांनी सांगितले. कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी शाश्र्वत शेतीच्या विकासामध्ये पशुधनाचे महत्व विशद केले. पारंपारीक शेतीला नवतंत्रज्ञानाची जोड देऊन शेतकऱ्यांनी आत्मनिर्भर होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी लाडके यांनी शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी कृषि विभाग कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा असल्याचे सांगून शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. प्रमुख मार्गदर्शक प्रा. अरुण गुट्टे व प्रा. डॉ. वसंत सूर्यवंशी यांनी उपस्थित शेतकऱ्यांना तूर व हरभरा या कडधान्य पिकाचे महत्त्व, पीक फेरपालट व तूर, हरभरा या पिकांवर येणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पंचसूत्रीचा अवलंब करून आपल्या उत्पादनात वाढ करण्याबाबत मार्गदर्शन केले. एडीएम ॲग्रोचे वाणिज्य विभाग प्रमुख एम.बी.गाजरे यांनी एडीएम कडून सोयाबीन सोबतच तूर आणि हरभरा या पिकांच्या मूल्यसाखळी संवर्धनासाठी प्रयत्न सुरु असल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोपात डॉ. दिनकर जाधव म्हणाले, लातूरची तूर ही ओळख कायम ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. येणाऱ्या काळात सोयाबीनचे क्षेत्र वाढून त्याची मोठी बाजारपेठ विकसित होईल. यामध्ये शेतकऱ्यांनी टिकून राहण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करताना अधिक उत्पादनक्षम वाणांचा प्रचार व प्रसार करावा, असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी प्रगतशील शेतकरी प्रकाश झुंजे पाटील, श्रीराम साळुंखे, डॉ. विजय भामरे, दिलीप राऊत, अनंत गायकवाड, विकास फार्मर प्रो. कंपनी चे संचालक विलास उफाडे तसेच एडीएमचे अमोल ढवण, अंजली रितू, राम सिनगारे, गोपाळ तळेकर, एडीएम आणि विकास ॲग्रोचे सहकारी वृंद व नागझरी, हरंगुळ, टाकळी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दयानंद माने यांनी केले.

19 TO 25 FEBRUARY 2024 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 2/18/2024 8:27 PM Page 1



# नालासोपाऱ्यातील 'सिरीयल रेपिस्ट'च्या गुजरात येथून अटक




**नालासोपारा/प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून फरार झालेल्या 'सिरीयल रेपिस्ट'ला गुन्हे शाखा २ च्या पथकाने गुजरात येथून अटक केली आहे. बागपत मारवाडी (२८) असे या विकृत आरोपीचे नाव आहे. यापूर्वी त्याने एकूण दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचे उघड झाले आहे. गेल्या काही महिन्यांपासून वसई विरार शहरात सिरीयल रेपिस्टची दहशत पसरली होती. हे विकृत अल्पवयीन शाळकरी मुलींना बळजबरीने आडोशाला घेऊन त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करत होते. याप्रकरणी एका विकृत आरोपीला गुन्हे शाखा ३ पथकाने वाराणसी येथून अटक केली होती. मात्र दुसरा आरोपी फरार होता. दरम्यान, या फरार असलेल्या आरोपीने मंगळवारी नालासोपारा येथील आठ वर्षे चिमुकल्या मुलीला गच्चीवर नेऊन अनैसर्गिक अत्याचार केला होता. सीसीटीव्हीमध्ये तो इमारतीतून बाहेर जाताना दिसून आला होता. या विकृत आरोपीचा शोध घेण्यासाठी गुन्हे शाखा २ च्या पथकाने विशेष मोहिम हाती घेतली होती. या परिसरातील २५० पेक्षा जास्त सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यात आले होते. या कृत्यानंतर आरोपीने आपला मोबाईल फोन बंद ठेवला होता. मात्र पोलिसांनी परिसरातील मोबाईल टॉवरचा डंप डेटा (त्या वेळी परिसरात करण्यात आलेले फोन) काढला. त्यावेळी अडीच हजारांहून अधिक कॉल्स करण्यात आले होते. या सर्व मोबाईल क्रमांकाचे वर्गीकरण करून पोलिसांनी आरोपीचा माग काढला. घटनेनंतर आरोपी हा कल्याण येथे गेला होता. पोलिसांचे पथक कल्याण येथे पोहोचले पण तोपर्यंत आरोपीने राजस्थानला जाण्यासाठी अजमेर एक्स्प्रेस रेल्वे पकडली होती. पोलिसांनी सुरत पोलिसांच्या गुन्हे शाखेला संपर्क साधून सुरत येथून त्याला अटक केली. अस्पष्ट सीसीटीव्ही कॅमेरे आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गुन्हे शाखा दोनच्या पथकाने अवघ्या ४८ तासांत आरोपीला अटक करण्यात यश मिळवले. पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूराज रणावरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष कांबळे, सागर प्रकाश शिंदे आदींच्या पथकाने या विकृताला बेडया ठोकल्या. आरोपी बागपत मारवाडी हा बेरोजगार असून नालासोपारा येथे राहतो. यापूर्वी त्याने नालासोपारा येथील तुळींज आणि आचोळे परिसरात दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. पुढील तपासासाठी त्याला आचोळे पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. आरोपीने आणखी मुलींवर अशाप्रकारे लैंगिक अत्याचार केला आहे का त्याचा पोलीस तपास करत आहेत.

# फॅन्सी नंबर प्लेटवर पोलिसांची करवाई; १७७ लाखावर दंड वसूल

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**





सोलापूर शहरात फॅन्सी नंबर प्लेट लावून सुसाट वेगाने वाहने चालवणाऱ्या मोटरसायकल व चारचाकी वाहनांच्या विरोधात सोलापूर शहर वाहतूक पोलीस आक्रमक झाले आहेत. विशेष मोहिमेत २ दिवसात १७७ वाहनावर कारवाया करून १ लाख १ हजार ७०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. या मोहिमेपाठोपाठ आता रिक्षावरी कारवाईची मोहीम हाती घेण्यात येणार आहे. सर्वांनी युनिफॉर्मकडे लक्ष केंद्रित करावे. सर्वांचे कागदपत्रे तपासण्यात येणार असल्याचे संकेत दिले आहेत. शहर वाहतूक शाखेच्या दक्षिण व उत्तर शाखेकडून गुरुवारी भैया चौक, सात रस्ता, डफरीन चौक, सिव्हील चौक, आम्रपाली चौक परिसरातील बेकायदेशीर फॅन्सी नंबर प्लेट असलेल्या वाहनावर करडी नजर ठेवून कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली. यात दक्षिण विभागाकडून २६ फॅन्सी नंबर प्लेट १८ ट्रिपल सी १२ मोबाईल वर बोलणारे ५ जण विना लायसन्स असणारे अशा ६१ जनावर कारवाई करून ३४ हजार ४०० रुपये पूर्वीचा व सध्याचा दंड वसूल करण्यात आला बुधवारच्या कारवाईसह ५१ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. उत्तर शाखेच्या वतीने गुरुवारी फॅन्सी नंबर प्लेट असलेल्या ४२ वाहनावर कारवाई करून ३४ हजार रुपयांचा तर बुधवारी ३५ वाहने पकडून त्यांच्याकडून १६ हजार ३०० रुपये असा ५० हजार ३०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. दोन्ही विभागाकडून १ लाख १ हजार ७०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

दरम्यान वाहन परवाना नसताना लहान मुले मोटरसायकल चालवण्याचे प्रमाण वाढले आहे शिवाय ट्रिपल सीट वेगाने वाहन चालवण्याने अपघातांची संख्या वाढली आहे नुकताच ट्रिपल सीट वाहन चालवल्याने तिघा तरुणांना जीव गमावा लागला अशा वाहनावर पायबंध घालण्यासाठी कारवाईचा बडगा उचलला जाणार असल्याचे सांगण्यात आले. फॅन्सी नंबर प्लेटवर नंतर यापुढे ऑटोरिक्षाकडेही धडक मोहीम हाती घेण्यात येणार आहे यासंदर्भात सर्व रिक्षा चालकांना सूचना देण्यात येत आहेत युनिफॉर्म असणे गरजेचे आहे शिवाय सर्व कागदपत्रे अपडेट ठेवावीत अन्यथा कारवाई केली जाणार असल्याचे उत्तर विभागाचे पोलीस निरीक्षक धनाजी शिंगाडे यांनी सांगितले. परिवहन प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या नियमानुसारच वाहनांना नंबर प्लेट असणे गरजेचे असताना त्याचा अंमल होत नसल्याचे लक्षात आल्याने गेली दोन दिवसापासून आम्ही कारवाईची मोहीम हाती घेतले आहे ही मोहीम आणखी कडक केली जाणार असल्याचे वाहतूक शाखेच्या दक्षिण विभागाचे पोलीस निरीक्षक तानाजी दराडे यांनी सांगितले.

# शिवजयंतीच्या अनुषंगाने वाडा पोलीस ठाण्यात बैठक संपन्न



**वाडा/प्रतिनिधी**

सोमवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी होणार आहे. त्या अनुषंगाने वाडा पोलीस ठाण्यात विशेष बैठकींचे आयोजन करण्यात आले होते. वाडा पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक रणवीर बयेस यांनी शिवजयंती उत्सव आनंदाने, हर्षउल्हासात व शांततेत साजरा व्हावा या उद्देशाने बैठकीचे आयोजन केले होते. वाडा शहरात दोन मंडळांच्या वतीने मिरवणुकीचे आयोजन आहे तर तालुक्यात एकूण १२ ठिकाणी शिवरायाच्या प्रतिमेचे पूजन होणार आहे. वाड्यातील साईलीला सेवा मंडळ व ज्ञानदा प्रकाशनच्या वतीने भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेंच कांबरे शिव मंडळ, आबिटघर, शिरीष पाडा, कुडूस शिव जयंती मित्र मंडळ, परळी शिवक्रांती मित्र मंडळ, खाणीवली या ठिकाणी ही विविध कार्यक्रम ठेवण्यात आले आहेत. सदर बैठकीस युवराज ठाकरे, संदीप रोडगे, तेजस गंधे, दीपक कबाडी, मंदार रोडगे, प्रताप डोहाळे व विविध मंडळांचे इतर पदधिकारी उपस्थित होते. सर्व मंडळ व पदाधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज जयंती अतिशय शिस्तबद पद्धतीने साजरी करत कायद्याचे उल्लंघन होणार नाही, शहरात शांतता सुव्यवस्था राखण्यास पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन बयेस यांनी केले आहे.

# थकित मार्जिनची रक्कम रास्त भाव दुकानदारांना मिळत लवकर मिळावी यासाठी मंत्री छगन भुजबळ यांना निवेदन




**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील सहा महिन्यापासून मार्जिनची रक्कम रास्त भाव दुकानदार यांना मिळत नसल्याबाबत देवणी तालुका रास्त भाव संघटनेचे अध्यक्ष नितीन देशमुख यांनी महाराष्ट्र राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्याशी मंत्रालय मुंबई येथे भेट घेऊन चर्चा करून निवेदन दिले आहे. संबंधित सहसचिव यांना स्पष्ट निर्देश दिले की मार्जिनची रक्कम जर वेळेत दिले नाही. तर चालणार नाही विना विलंब मर्जीनची रक्कम तात्काळ देण्याचे निर्देश दिले असल्याचे देशमुख यांनी सांगितले.

# देवणी नगरपंचायत सभापती पदाच्या निवडी बिनविरोध




**देवणी/प्रतिनिधी**

देवणी नगरपंचायत विषय समितीच्या सभापतीच्या निवडी बिनविरोध करण्यात आल्या आहेत. नगरपंचायत सभापतीच्या निवडीसाठी बोलावण्यात आलेल्या बैठकीत काँग्रेसचे बहुमत असल्याने अपेक्षेप्रमाणे सभापतीपदाच्या निवडी बिनविरोध संपन्न झाल्या.

निवडीनुसार सार्वजनिक बांधकाम समिती सभापती पदी सत्यभामा खंडेराव घोलपे. तर स्वच्छता वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य समिती सभापती म्हणून प्रवीण चंद्रशेखर बेळे तर पाणीपुरवठा व जल नीसारण समिती सभापती पदे श्रीमती वंदना राजकुमार बंडगर यांची व महिला आणि बाल कल्याण समिती सभापती पदी सौ बानू बेगम जाफर साब मोमीन तर नियोजन व विकास समिती सभापती पदी नप उपाध्यक्ष अमित शेषराव मानकरी यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. तसेच स्थायी समितीच्या सभापती पदी पदसिद्ध पणे नगर परिषद अध्यक्ष डॉ कीर्तीताई संजय घोरपडे यांची निवड झाली आहे. झालेल्या निवडीच्या बैठकीचे पीठासन अधिकारी म्हणून निलंगा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी शरद झाडगे हे तर सहाय्यक म्हणून मुख्याधिकारी गजानन शिंदे व तहसीलदार गजानन शिंदे हे उपस्थित होते. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा प्रशासनातर्फे सत्कार करण्यात आला.

# पालिका उधानात बालकांसाठी खेळणी

**विरार/प्रतिनिधी**

विरारच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर नौका विहार केंद्रातील वासुदेव वालू पाटील उद्यानात खेळणी, व्यायामाची साधने बसवण्यात आली आहेत. प्रजासत्तादिनी हे उद्यान सर्वासाठी खुले करण्यात आले. लाखो रुपये खर्च करुनही वसई-विरार महापालिकेच्या बहुतांश उद्यानांची देखभाल, दुरुस्ती होत नसल्याच्या नागरीकांच्या तक्रारी होत्या. सततच्या तक्रारी नंतरही उद्यानांतील खेळण्यांची व बागेतील वृक्ष लागवडीची देखभाग होत नव्हती. याबाबत नागरीकांनी पालिकेच्या उदासिन वृत्तीची नाराजी व्यक्त करुन टीका केली होती. पालिकेच्या निष्काळजीमुळे मनवेलपाडा येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिमा नौका विहार उद्यानाचीही दुरवस्था झालेली होती. लहान मुलांसाठीची खेळणी व ज्येष्ठ महिला आणि पुरुषांकरिता असलेली व्यायामाची साधने मोडलेल्या अवस्थेत होती. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता होती. महापालिकेच्या नऊ प्रभागांतील उद्यानांत विविध प्रकारची खेळणी आणि फिटनेस साहित्य बसवण्याचा निर्णय तीन वर्षापूर्वी घेण्यात आला होता. यावर तब्बल १० कोटी रुपये खर्च करण्यात येणार होते. त्यामुळे या उद्यानांत नवीन खेळणी आणि फिटनेस साहित्य बसवण्याची मागणी होत होती.

# सोलापूरचे भाडेकरू झाले संभाजीनगरचे जिल्हाधिकारी -दिलीप स्वामी

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर भाडेकरू व घर मालकाचे नाते वेगळेच असते. आपल्या घरातून भाडेकरूचं चांगलं झालं की घरमालकाला आनंद होतोच. असाच किस्सा सोलापुरातील आहे. दिलीप स्वामी छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी झाले आणि त्यांच्या घरमालकाने फटाके फोडून आनंद व्यक्त केला आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांची २० जून रोजी बदली झाली पण त्यांना पुढील पोस्टिंग मिळाली नव्हती. त्यामुळे ते सरकारी निवासस्थानातच राहत होते. यादरम्यान त्यांनी नवीन पोस्टिंगसाठी मुंबईला अनेक हेलपाटे घातले. तीन महिने झाल्यानंतर त्यांना सरकारी निवासस्थान सोडावे लागले. त्यामुळे ते अंत्रोळीकरनगर क्रमांक दोन मधील हंद्राळे यांच्या घरी भाड्याने राहावयास आले. या ठिकाणी त्यांनी जवळपास चार महिने निवास केला. यादरम्यानच त्यांना छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी म्हणून




पोस्टिंग मिळाली. स्वामी जिल्हाधिकारी झाल्याचे कळताच घरमालक हंद्राळे यांनी फटाके फोडून आनंद व्यक्त केला. त्यामुळे अंत्रोळीकरनगरात हा चर्चेचा विषय झाला. दिलीप स्वामी हे कलेक्टर झाल्याची बातमी सर्वांनाच कळाली.

हंद्राळे हे सेवानिवृत्त अधिकारी आहेत. सेवेत असताना त्यांनी सोलापुरात अंत्रोळीकरनगरात घर घेतले. मूळचे संभाजीनगरचे असल्याने निवृत्तीनंतर ते तिथे राहाव्यास गेले. त्यामुळे त्यांचे घर रिकामेच होते. स्वामी यांनी या घरात आपले कुटुंब हलवले. त्यामुळे हंद्राळे व स्वामी यांचे घरमालक व भाडेकरू असे नाते निर्माण झाले. जिल्हा परिषदेचे सीईओ म्हणून काम केल्यानंतर कलेक्टरपदी बढती मिळते असा आजपर्यंतच्या सोलापूर जिल्हा परिषदेचा अनुभव आहे. परंतु स्वामी यांना पोस्टिंग न मिळाल्याने वेगवेगळी चर्चा रंगली होती. त्यांना रत्नागिरी, कोल्हापूरची पोस्टिंग मिळणार अशी ही चर्चा रंगली होती. अशातच स्वामी यांची कलेक्टर म्हणून संभाजीनगरला पोस्टिंग झाल्याचे समजताच हंद्राळे यांनी त्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन अभिनंदन केले. भाडेकरूची प्रगती व घर मालकाचा आनंद यातून हे नाते आणखीनच दृढ झाल्याचे दिसून येते. आपण घरमालक व भाडेकरूची अनेक उदाहरणे पाहिली व ऐकली असतील. काही ठिकाणी वाद तर काही ठिकाणी घरमालक भाडेकरूलाच घर विकत देतो तर काही ठिकाणी भाडेकरू नवीन घर घेऊन राहण्यासाठी निघतो त्यावेळेला घर मालक त्याचा सन्मान करतो असे अनेक किस्से पाहण्यात आले असतील. माझ्या घरातून भाडेकरूची चांगली प्रगती झाली याचे घरमालकाला मोठे समाधान असते, अशीच काहीशी भावना त्यातून दिसून येते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून दिलीप स्वामी यांनी सोलापुरात चांगले काम केले. ग्रामीण भागातील जनतेला चांगले शिक्षण व आरोग्य मिळावे म्हणून अनेक नवीन प्रयोग त्यांनी केले. त्यामुळे त्यांचे महाराष्ट्रात नाव झाले. यातून सोलापूरकरांशी त्यांचे एक वेगळे नाते निर्माण झाले. त्यामुळे त्यांच्या येथील कार्यकालातील बऱ्याच घटनांचे सोलापूरकर साक्षीदार आहेत. ते कलेक्टर झाल्यामुळे अनेकांनी आनंद व्यक्त केला आहे

# महागड्या गाड्यांची चोरी करणाऱ्या चोरट्यांना अटक



**मुंबई/प्रतिनिधी**

चाकीचे हँडल लॉक आहे का पहायला गेला आणि पोलिसांच्या तावडीत तो सापडला. अल्पवयीन मुलाच्या मदतीने स्टेशन परिसरातील महागड्या गाड्या चोरणाऱ्या दोन जणांना कोळसेवाडी पोलिसांनी अटक केली आहे. चिन्मय तलावडे (वय २०) असे अटक आरोपीचे नाव असून त्याच्यासोबत १७ वर्षीय अल्पवयीन मुलाला देखील पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तर दुसऱ्या एका गुन्ह्यात ३ अल्पवयीन चोरट्यांना पोलिसांनी अटक केली आहे. दोन्ही गुन्ह्यांत चोरी केलेल्या ३ दुचाकी पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत. वाढत्या वाहन चोरीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर कल्याण पूर्व परिसरात कोळशेवाडी पोलिसांनी तपासाला वेग दिला होता. कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू होता. म्हसोबा चौक परिसरात १४ फेब्रुवारी ला पोलिसांनी सापळा रचला होता. पोलिसांनी एका मोटार सायकल ला जावे तसेच ठेवून ती परिसरात उभी केली होती ही गाडी चेक करण्यासाठी चिन्मय तेथे गेला. यादरम्यान मोटरसायकलीचे हँडल लॉक आहे हा हे पहात असताना चिन्मय पोलिसांच्या तावडीत सापडला. त्याने १७ वर्षीय मुलाच्या साथीने या भागात चोऱ्या केल्या होत्या. त्यांच्याकडून २ मोटारसायकल जप्त करण्यात आल्या. दुसऱ्या घटनेत दिनेश कुमार शर्मा यांचे २८ जानेवारीला बुलेट मोटरसायकल चोरीला गेली होती. याचा शोध सुरू असताना पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही तपासले. त्यानुसार उल्हासनगर ४ येथून तीन अल्पवयीन चोरट्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी मौज मजा करण्यासाठी मोटरसायकल चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी ही मोटर सायकल हस्तगत केली आहे.

# वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या लॉजवर पोलिसांनी टाकली धाड

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा-सांगोला या राष्ट्रीय महामार्गावर लेंडवे चिंचाळे हद्दीतील ज्ञानेश्वरी लॉजवर चालणाऱ्या वेश्या व्यवसाय ठिकाणी सोलापूर पोलिस अधिक्षक कार्यालयातील अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक पथकाने छापा टाकून एका पिडीतेची सुटका करून लॉज मालक अविनाश येडगे याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, मंगळवेढा-सांगोला राष्ट्रीय महामार्गालगत लेंडवे चिंचाळे हद्दीत ज्ञानेश्वरी लॉजवर मालक तथा आरोपी अविनाश येडगे हा व्यवसायाकरीता महिला आणून त्यांना वेश्या व्यवसाय करण्याकरीता भाग पाडत असल्याची गोपनीय माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक पथकाचे प्रमुख पोलिस निरिक्षक बजरंग साळुंखे यांना समजताच त्यांनी २९ जानेवारी रोजी दुपारी दोन वाजून




वीस मिनिटांच्या सुमारास पथकासह घटनास्थळी दाखल झाले. सदर पथकाने एक बनावट ग्राहक पाठवून वेश्या व्यवसायाची खातरजमा करण्यात आली.यावेळी आरोपी हा बाहेरच्या राज्यातील महिला आणून वेश्या व्यवसाय करण्यास त्यांना भाग पाडत असल्याची माहिती स्पष्ट झाली. यावेळी आरोपी हा प्रत्येक ग्राहकाकडून एक हजार रुपये घेवून पिडीतेस ५०० रुपये व स्वतःकडे ५०० रुपये ठेवत असल्याचेही तपासात निष्पन्न झाले. सदर धाडप्रसंगी त्या दिवशी १३ ग्राहक केले असल्याचीही माहिती चौकशीत समोरआली आहे. सदर पथकाने छापा प्रसंगी मोबाईल, रोख रक्कम, निरोध पाकिटे जप्त केली असल्याचे पोलीस उपनिरिक्षक रेवणसिध्द काळे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाचे पोलीस निरीक्षक बजरंग साळुंखे, महिला पोलीस निरीक्षक कुरी, महिला पोलीस उपनिरीक्षक प्रणोती यादव, महिला पोलीस शिपाई प्रिती पाटील, चालक पोलिस शिपाई रामनाथ बोंबीलवार, पोलीस हेड कॉन्स्टेबल सचिन वाकडे, सुर्यकांत जाधव, सहाय्यक फौजदार मंजुळा धोत्रे आदींच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

19 TO 25 FEBRUARY 2024 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 2/18/2024 8:24 PM Page 1






# वसई विरार पालिकेचा ३ हजार ११२ कोटींचा अर्थसंकल्प सादर



**वसई/प्रतिनिधी**

वसई विरार शहर महापालिकेचा सन २०२३-२४ आर्थिक वर्षांचा २ हजार ९६८ कोटींचा सुधारीत अंदाज आणि सन २०२४-२५ या वर्षांचे मुळ अंदाज असलेला ३ हजार ११२ कोटींचा अर्थसंकल्प सोमवारी सादर झाला. १२ कोटी ३३ लाख रुपये शिलकीच्या या अर्थसंकल्पात मागील वर्षाच्या तुलनेत ३३२ कोटींनी वाढ करण्यात आली आहे. हे निवडणुकांचे वर्ष असल्याने यंदाच्या अर्थसंकल्पात पालिकेने कुठलीही करवाढ केलेली नाही. त्यामुळे नागरिकांना तुर्तास दिलासा मिळाला आहे. वसई विरार महापालिकेचा ४ था प्रशासकीय अर्थसंकल्प पालिकेचे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांनी आयुक्त तथा प्रशासक अनिलकुमार पवार यांना सादर केला. यावेळी मुख्य लेखा परिक्षक सुरेश बनसोडे, मुख्य लेखा अधिकारी (कॅफो) अभय देशमुख तसेच पालिकेचे सर्व उपायुक्त, कार्यकारी अभियंता उपस्थित होते. प्रशसाकांकडून अंदाजपत्रकातील तरतुदींवर चर्चा केल्यानंतर त्याला अंतिम मंजुरी दिली जाणार आहे. मागील वर्षाच्या अर्थसंकल्पातून महापालिकेने जवळपास ८० टक्के निधी खर्च केला आहे. मालमत्ता, नगररचना शुल्क, बाजार फी, पाणीपट्टी यातून पालिकेला चालू आर्थिक वर्षात अपेक्षेपेक्षा जास्त उत्पन्न मिळाले आहे. त्यामुळे येत्या अर्थसंकल्पात पालिकेने या उत्पन्नाच्या उद्दिष्टात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यंदा विकास आराखडाचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यासाठी भौगोलिक मानांकनासाठी ३६ कोटींची वाढ करण्यात आली आहे. नवीन नोकर भरती, अधिकार्यांच्या नियुक्ती तसेच अनेक कर्मचार्यांना कायम सेवेत घेतले जाणार असल्याने आस्थापना खर्चातही वाढ केली जाणार आहे. चालू आर्थिक वर्षात भांडवली अनुदान १६४ कोटींचे होते ते पुढील आर्थिक वर्षात ४१३ कोटी एवढे वाढविण्याचा पालिकेचा प्रयत्न आहे.

# वर्तक महाविद्यालयाच्या रोजगार मेळाव्यात ३९४ रोजगारार्थींना मिळाली प्रस्तावपत्रे!




**वसई/प्रतिनिधी**

विद्यावर्धिनी शिक्षणसंस्थेच्या अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या भव्य रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून वसई विरार परिसरातील रोजगारासाठी इच्छुक तरुण आणि त्यांच्यासाठी उपलब्ध असणाऱ्या रोजगार संधी घेऊन येणारी आस्थापने यांच्यात समन्वय साधण्यासाठी मंच उपलब्ध करून देण्यात आला. महाविद्यालयाच्या रोजगार कक्षातर्फे या भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. १० फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यावर्धिनी शिक्षण संस्थेच्या सी.आर. राजाणी सभागृहात या रोजगार मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. विद्यावर्धिनी शिक्षणसंस्थेचे उपाध्यक्ष आणि महाविद्यालय समितीचे अध्यक्ष बबनशेठ नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आणि विद्यावर्धिनी शिक्षणसंस्थेचे कोषाध्यक्ष हसमुखभाई शहा, उद्योजक अतीन शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. मुख्य पाहुणे उत्पल शहा यांनी विद्यार्थ्यांना आणि रोजगारासाठी इच्छुक असणाऱ्या उमेदवारांना विविध आवश्यक कौशल्य आणि पूर्वतयारी यासंबंधी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे यांनी आपले महाविद्यालय हे शिक्षणाचे केंद्र होण्याबरोबरच रोजगारकेंद्री उपक्रम राबवण्यालाही महत्त्व देत असल्याचे सांगितले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबरोबरच परिसरातील रोजगारेच्छु बेरोजगारांसाठी ही एक मंच उपलब्ध करून देण्याचा हेतू या उपक्रमामागे असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या अध्यक्ष भाषणात श्री. बबनशेठ नाईक यांनी या उपक्रमाची मुक्तकंठाने स्तुती केली व हा उपक्रम यशस्वी व्हावा यासाठी शुभेच्छा दिल्या. वसईचे माजी महापौर रुपेश जाधव यांनीही या रोजगारमेळाव्याला सदिच्छा भेट दिली. त्यांच्या हस्ते काही उमेदवारांना नोकरीची प्रस्तावपत्रेही वितरित करण्यात आली. या रोजगार मेळाव्यासाठी १८६० रोजगारार्थींनी ऑनलाईन नाव नोंदणी केली. एकंदर ३२ कंपन्या विविध रोजगार प्रस्तावांसह उपस्थित होत्या. विविध मुलाखती, चाचण्या आणि चाळण्यांच्या अंती ३९४ उमेदवारांना त्याचदिवशी नोकरीसाठी प्रस्तावपत्रे देण्यात आल्याचे महाविद्यालयाच्या रोजगार कक्षाचे प्रमुख डॉ. विली शहा यांनी सांगितले.

# वसईतील दिव्यांगांचे पुनर्वसन करून त्यांच्या जीवनात आनंद फुलविण्याचे काम 'अपंग सेवा संस्था' करीत आहे -शिवाजी गाडे




**वसई/प्रतिनिधी**

नंदाखाल चर्चच्या परिसरात ३७वा अपंगांसह स्नेहमेळावा संपन्न झाला. संपूर्ण नंदाखाल धर्मग्रामस्थांनी मेळावा साजरा करण्यासाठी मोठ्या हिरीरीने हजेरी लावली. वसईच्या वेगवेगळ्या भागातून आणि बाहेरून ३०० हून अधिक दिव्यांगी एकत्र आले होते. सकाळी नऊपासून कार्यक्रम सुरू झाला. प्रारंभी सर्वधर्मीय प्रार्थना झाली. त्यामध्ये मुस्लिम मुलांनी कुराणातली वचने गायली; बायबलमधील प्रेमाचा संदेश दिला गेला. आणि भगवत गीतेमधून देखील उतारा वाचला गेला. वाद्यवृंदाने संपूर्ण प्रार्थनासभेला 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' ह्या गायनाने एक सुंदर झालर दिली. उपस्थित सर्व धर्मीय दिव्यांगी समाधान पावले. सायंकाळी जाहीर सभा झाली. त्या सभेच्या अध्यक्ष होत्या सौ. मीना अँड्रू डिमेलो. त्यांनी आपल्या संदेशात त्या स्वतः कशा लहानपणी पोलिओग्रस्त झाल्या होत्या; पण त्यांच्या आईबापांनी 'तनमनधन वेचून' त्यांना सावरले, ते सांगितले. तो प्रसंग ऐकताना बऱ्याच जणांच्या अंगावर शहारे आले. प्रमुख पाहुणे होते श्रीयुत शिवाजी गाडे, शिवुर्जा प्रतिष्ठान, संभाजीनगर यांचे संचालक. त्यांनी संदेश देताना म्हटले, सर्वत्र दिव्यांगांची आंदोलने होतात, त्यांना सरकारी योजना समजावून देण्यासाठी सभा समारंभ होतात; परंतु दिव्यांगांना असे एकत्र आणून दिवसभराचे करमणुकीचे कार्यक्रमवजा स्नेहसंमेलन फक्त वसईत भरविल्या जात असून, दिव्यांगांचे पुनर्वसन करून त्यांच्या जीवनात आनंद फुलविण्याचे काम 'अपंग सेवा संस्था' तळमळीने करीत आहे. म्हणून या मेळाव्यात येण्याची माझी ही दुसरी वेळ आहे. नंदाखाल चर्चचे पॅरीश प्रीस्ट फादर थॉमस डिसूजा यांनी आभार मानताना 'अपंग सेवा'ने चर्चचे ४५०वे वर्ष यथार्थपणे साजरे करण्यासाठी हा सुंदर अपंग मेळावा घेण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानले. संचालिका सिंथिया बॅप्टिस्टा यांनी अपंग सेवेतर्फे मेळाव्याचे यजमानपद समर्थपणे सांभाळल्याबद्दल नंदाखाल पॅरीशचे आभार मानले. तत्पूर्वी विविध मैदानी खेळांच्या स्पर्धा झाल्या. त्यामध्ये फादर निलेश तुस्कानो यांनी चेतनादायी नेतृत्व केले. ॲक्शन साँग्स, गटांतील व्यवसाय, कुबडीधाव, अंडर आम क्रिकेट, तीन चाकी सायकल इत्यादी स्पर्धा झाल्या. युवा संघाने खूप धावपळ केली. अर्थात मैदानी खेळ उन्हात झाले. परंतु प्रेक्षकांसाठी मात्र मंडपातली सावली होती! साडेबारा वाजेपर्यंत अनेक नागरिकांनी मेळाव्याला भेट दिली व अपंगांच्या आनंदामध्ये ...पान ६ वर

# शाश्वत शेतीसाठी शेतकऱ्यांनी नवतंत्रज्ञानाचा अवलंब करावा -जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे



**लातूर/प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी नवतंत्रज्ञानाच्या आधारे शेतीतील उत्पादन खर्च कमी करून गुणवत्तापूर्ण उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतीतून उत्पन्नाचा शाश्र्वत स्रोत निर्माण होईल. यासोबतच शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्वतःच्या शेतमालाची ब्रॅण्डिंग, मार्केटिंग स्वतः करण्यावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.शाश्र्वत शेती उपक्रमाअंतर्गत एडीएम ॲग्रो इंडस्ट्रीज इंडिया प्रा. लि, विकास ॲग्रो फार्मर प्रा. कंपनी लि. आणि लातूर कृषि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नागझरी येथे जागतिक कडधान्य दिनानिमित्त आयोजित 'शेतकरी परिसंवाद' कार्यक्रमात जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. माजी कृषी सहसंचालक डॉ. दिनकर जाधव, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवसांब लाडके, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, प्रा. डॉ. अरुण गुट्टे व प्रा.डॉ. वसंत सूर्यवंशी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. ...पान ६ वर

# धनगर समाजाच्या विविध मागण्यास भाजपा लातूर ओबीसी मोर्चाचा पाठिंबा




**औसा/प्रतिनिधी**

सकल धनगर समाज महाराष्ट्र राज्य वतीने धनगर आरक्षणाच्या संदर्भात विविध मागण्यांसाठी औसा जिल्हा लातूर येथे नितीन पंडितराव बंडगर पाटील गेल्या चार दिवसापासून आमरण उपोषण करत आहे. या ठिकाणी आज औसा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार अभिमन्यू पवार यांच्या सूचनेवरून उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्यांचे निवेदन स्वीकारलं व भाजपा लातूर ग्रामीण ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष म्हणून संपूर्ण ओबीसी समाजाच्यां वतीने आरक्षणास पाठिंबाचे पत्र दिले. यावेळी भाजपा ओबीसी मोर्चा लातूर ग्रामीणचे उपाध्यक्ष विकास नरहरे, उपाध्यक्ष ॲड. नितीन मेहत्रे, सरचिटणीस राम कांबळे, ओबीसी मोर्चा महिला जिल्हाध्यक्ष शशिकलाताई दूधभाते,औसा ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी, औसा शहर ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष दत्तात्रेय कलमे, ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष विजय माने, ओबीसी मोर्चा जिल्हा चिटणीस लिंबराज थोरमोठे इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी उपोषण स्थळी संबोधन करत असताना उपोषणकर्त्यांनी केलेल्या मागण्यांची दखल शासनाने घेतली असून, धनगर समाजाच्या आरक्षणाशिवाय इतर बऱ्याच मागण्या खूप वर्षा पासून प्रलंबित असून, या मागण्या सरकारने गांभीर्याने विचार करून तात्काळ त्यावर तोडगा काढावा अशी ओबीसी जिल्हाध्यक्ष म्हणून मागणी केली. तसेच आजच्या दिवशी औसा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार अभिमन्यू पवार उपोषण स्थळास भेट देणार असून, आपल्या मागण्या राज्य सरकारकडे त्या लवकरात लवकर पोहोचतील शिवाय लोकप्रिय आमदार अभिमन्यू पवार यांनीच ओबीसीच्या हक्कांच्या विविध मागण्यासंदर्भात सर्वप्रथम विधानसभेत आवाज उठवला होता. त्यावेळी त्यांना विधानसभेतून काही कालावधीसाठी निलंबित ही करण्यात आले होते, तर नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात नागपूर येथे धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणी संदर्भात सभागृहात लक्षवेधी मांडून सरकारचं लक्ष या आरक्षणाकडे वेधलं होतं त्यामुळे आपल्या मागणीच्या संदर्भात नक्कीच सकारात्मक विचार करून आमदार अभिमन्यू पवार नक्कीच तोडगा काढतील त्यामुळे आपण आपलं आमरान उपोषण थांबवावं अशी सकल धनगर समाजाच्या नेत्यांना यावेळी ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष म्हणून विनंती केली.

